श्री शंकर महाराज

स्वामी रामतीर्थ

पूज्य तात्यासाहेब केतकर

श्री मामासाहेब दांडेकर

श्री निसर्गदत्त महाराज

श्री योगी लेले महाराज

॥ संतबोध ॥

भाग-४

डॉ. सुहास पेठे

श्री ज्ञानेश्वर माउली

श्री मेहेरबाबा

श्री योगी अरविंद

श्री कलावती आई

पूज्य भय्याजी कायंदे

स्वामी शिवानंद सरस्वती

संतबोध

भाग : ४

डॉ. सुहास पेठे

एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

* संतबोध :- ४

पुस्तकरूपाने प्रकाशित पहिली आवृत्ती : जानेवारी २०१६
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

♣ संतांची आरती ♣

गाऊ संतांची आरती । देव जागा करिती चित्ती ।।धृ।।

निर्गुण दुर्लभ देव झाला । त्यांनी सगुणात आणिला ।।१।।
स्वार्थी जीव जो गुंतला । त्याला परमार्थी लाविला ।।२।। गाऊ..

खोटा कर्ता जो तो झाला । कोण कर्ता तो दाविला ।।३।।
प्रारब्धाची पुसली रेखा । यत्न देव हा ओळखा ।।४।। गाऊ..

मिथ्या अशुद्ध देव गेले । शुद्ध देवांसी स्थापिले ।।५।।
सद्‌गुण स्वप्नीचे वाटले । त्यांनी जगुनीया दाविले ।।६।। गाऊ..

लोकांसम हे जगती आले । मात्र मृत्यू पुसुनी गेले ।।७।।
सूक्ष्म रूपात राहिले । प्रमाण आजहि देती भले ।।८।। गाऊ..

अपार बुद्धीचे सागर । केला सूक्ष्माचा व्यवहार ।।९।।
सोने मातीत दाखविती । मीपण सरता हाती देती ।।१०।। गाऊ..

पैसा भपका केला दूर । साधेपणावरी भर ।।११।।
प्रेम नि:स्वार्थाचे भजन । अवघे त्यागाचे जीवन ।।१२।। गाऊ..

त्यांच्या बोधाचे चिंतन । आम्हा घडो रात्रंदिन ।।१३।।
आचरणाची नित्य सेवा । दीन म्हणे घडो देवा ।।१४।। गाऊ..

।। सब संतन की जय ।।

संतबोध - भाग : ४

● अनुक्रम ●

पृष्ठक्रमांक

१. करा, तेही आजच !
- स्वामी शिवानंद सरस्वती ...७

२. ईश्वराचा नकारही आपल्याला
होकाराइतकाच उपकारक असतो.
- श्री योगी अरविंद ...११

३. दोन माणसांपासून सावध राहावे.
- पू. तात्यासाहेब केतकर ...१७

४. तळमळ असणे चांगले,
पण अधीरपणा वाईट.
- श्री योगी लेले महाराज ...२३

५. शिष्याची बुद्धी जितकी प्रखर
तितकी त्याची साधक म्हणून पात्रता कमी.
- श्री निसर्गदत्त महाराज ...२९

६. सिद्धांची जी लक्षणे असतात,
ती साधकाची साधने असतात.
- श्री मामासाहेब दांडेकर ...३५

७. अनुकूलतेच्या आणि उताराच्या
जागा शोधून नदी ओलांडावी...!
- श्री ज्ञानेश्वर माउली ...४३

८. राग-प्रतिक्रिया-सूड यांचा आनंद
हा क्षणभर असतो,
पण क्षमेचा आनंद हा चिरकाल असतो..
- श्री मेहेरबाबा ...५१

९. जहाजे काही काळ गोदीत आणून ठेवावीत...
- स्वामी रामतीर्थ ...५५

१०. मुले दुसऱ्याच्या धक्क्याने
पडली असता मोठ्याने रडतात...
- श्री कलावती आई ...६१

११. नदीच्या पाण्याप्रमाणे सतत प्रवाही राहा...
- श्री शंकर महाराज ...६५

१२. आपल्या नियोजनात परमेश्वराचे अस्तित्व व
त्याने केलेले नियोजन याला वाव ठेवा..
- पूज्य भय्याजी कायंदे ...६९

***

संतवचनांचं अथांग दालन..

या युगातील मोठा, दृश्य, सार्वत्रिक चमत्कार म्हणजे संत होत. आपल्यासारख्याच जन्माला आलेल्या, आपल्यासारख्या वातावरणात राहूनही देवपदाला पोचलेल्या, तसंच इतरांनाही हे पद प्राप्त व्हावं,निदान त्यांच्या जीवनातलं दु:ख, चिंता, विवंचना हे थोडं तरी हलकं व्हावं म्हणून निरलसतेनं आपलं आयुष्य वेचणाऱ्या या व्यक्ती म्हणजे सगुण अवतारच होत. ते देहानं गेले तरी सूक्ष्मरूपानं अनंत काळपर्यंत ईश्वरी इच्छेनुसार श्रद्धावंतांसाठी असंच कार्य करीत असतात.

अशा संतांनी माणसावर ठेवलेल्या अनेक ऋणांपैकी एक ऋण त्यांच्या वचनांचं. हे संतवचनांचं दालन अथांग आहे. त्यांतून मिळणारा बोध हा संतांना स्वत:ला झालेला व त्यांनी आचरलेला असल्यानं तो आपल्याला घेण्यासारखा आहे. ज्या असंख्य वचनांनी इतरांप्रमाणंच मलाही आजवर प्रेरणा दिली, प्रसंग – व्यक्ती–विचार यांकडे बघण्याची विधायक, अनेकदा पूर्ण नवीन दृष्टी दिली, त्यांचा कोणास उपयोग होत असल्यास व्हावा या हेतूनं ही संकलनं प्रसिद्ध होत आहेत.

या वचनांच्या मला वाटलेल्या उपयोगाची दिशा समोर यावी यासाठी वचनांचं थोडक्यात निरूपण दिलेलं आहे. संतवचनं अर्थगर्भ व शाश्वत असल्यानं वाचक आपापल्या जीवनाच्या ठेवणी व गरजांनुसार अधिक अर्थ घेऊ शकतीलच. संतांचं, संतवचनांचं व ती मुळात उपलब्ध करून देणाऱ्या प्रकाशकांचं ऋण न फिटणारं आहे.

या सेवाभावी प्रकाशन प्रकल्पाला नेहमीप्रमाणं साहाय्य करणाऱ्या साधकांचा, तसंच पुस्तक आकाराला येण्यात मदत करणाऱ्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

संतछाया
संतनगरी, सातारा **- सुहास पेठे**

१.

करा, तेही आजच !

- स्वामी शिवानंद सरस्वती

मनुष्य सामान्य झाला तरी त्याला बरं-वाईट कळतं. हिताचं-अहिताचं काय हेही कळतं. शिवाय त्याला मोठ्यांच्या सांगण्यातून, चांगल्या ग्रंथांतून या गोष्टींची कल्पना येत असते. चांगल्या कृती कराव्या असं त्याला मनापासून वाटतंसुद्धा ! पण ज्या मनापासून हे वाटतं, त्या मनाच्याच काही खोडी असतात. तशा त्या खोडी म्हणून लक्षातही येत नाहीत. म्हणजे इतक्या त्या बेमालूम असतात.

समजा, शाळेतून येताना शेवटच्या तासाला प्रगतिपत्रक हातात पडतं. नेहमीप्रमाणं परिस्थिती गंभीर असते. घरी आल्यावर काही काळानंतर का होईना प्रगतीची चौकशी होते. त्याचं आधी वाटलेलं गांभीर्य आता मोठ्या भावांच्या, पालकांच्या प्रतिक्रियांनंतर आणखीनच वाढतं. मुलाचा स्वतःचाही काही गंभीर विचार होतो. राहिलेला अभ्यास, अभ्यासपद्धतीतल्या उणिवा - अशा अनेक गोष्टी समोर येत असतात. वाया दवडलेला वेळही मनाला भेडसावीत असतो. तोच इकडं वापरला असता, आधीच्या लक्षात आलेल्या चुका केल्या नसत्या तर, यापेक्षा कितीतरी जास्त गुण मिळाले असते हेही मनाला पक्कं पटतं. उपाययोजनाही ठरते.

तेवढ्यात कुठंतरी कुणा मित्राची हाक येते. थोडा वेळ गप्पांत जातो. तितक्यात जेवणासाठी आईची हाक येते. जेवणाच्या वेळी सगळी एकत्र आल्यावर बहुधा या प्रगतिपुस्तकावर चर्चा होते. त्यामुळं पुन्हा अभ्यासाचा

निर्धार होतो. मग जेवणात ती चर्चा कुठल्यातरी दुसऱ्या विषयावर जाते. बोलता बोलता मुलगाही त्यात सहभागी होतो. सगळेच त्यात रंगून जेवणाचा शेवट त्या विषयावरच होतो. मुलगा उठून खोलीत जातो. तिथली पुस्तकं, दप्तर पाहिल्यावर त्याला पुन्हा एकदा अभ्यासाची जाणीव होते. पण या सगळ्यांत उशीर झालेला असतो. नेहमीची झोपेची वेळ टळलेली असते. आता उद्यापासून वेळेचं नियोजन, अभ्यासातल्या उणीवा दूर करणं असे निर्धार पुन्हा एकदा मनाशी होतात. आधी झालेला उशीर, जेवणात गेलेला वेळ, डोळ्यांवर आलेली पेंग - अशा सगळ्यांचा मन विचार करतं आणि ठरतं की, आत्ता जर जागून अभ्यास करायचा ठरवलाच तर, उद्या उठायला उशीर होणार आणि सारं उद्यापासून ठरवलेलं घडणार नाही. त्यापेक्षा आत्ता जर वेळेत झोपलो तर, उद्यापासून सगळं ठरल्याप्रमाणं नीट करता येईल. झोपणं हातात असतं, त्याला मनाची साथही असते - समर्थनही असतं. उठणं मात्र हातात नसतं. त्यामुळं आदल्या रात्रीच्या उशीराचा परिणाम होऊन दुसऱ्या दिवशी जागच उशीरा येते. अर्थातच ठरलेलं टाईमटेबल पहिल्या दिवशीच पुढं सरकतं.

याचं खरं कारण पहिला दिवस 'उद्या' ठरला होता ! ज्या दिवशी हे लक्षात आलं, तोच दिवस जर या सुधारणांचा पहिला दिवस असता, तर थोडं जागून का होईना, काही अभ्यास नक्कीच झाला असता. पण त्यासाठी स्वामीजी म्हणतात तसं, करायचं ठरलं ना, मग 'आजच करा !' हे त्या विद्यार्थ्याला कदाचित माहीत नसावं. ते माहिती असतं तर, अभ्यास तर झालाच असता, उलट निश्चयाचं पहिलं पाऊल आजच टाकल्यानं 'उद्या'चा दिवस हा अभ्यासाचा, निर्धाराचा दुसरा दिवस ठरला असता !

हे लहानांचंच होतं असं नाही किंवा केवळ अभ्यासाचं होतं असंही नाही. आपण जरा बारकाईनं पाहिलं तर, ते लहानांपासून थोरांपर्यंत अनेक

विषयांत, अनेक क्षेत्रांत घडत असताना दिसेल. त्यामुळं होणारं अपरिमित नुकसानही लक्षात येईल.मुळात हे लक्षात घ्यावं की, कष्टाचे,हिताचे,चांगल्याचे निर्णय मनाकडून आधीच कमी प्रमाणात होत असतात. त्यामुळं असा चांगल्या कामाचा निर्णय भाग्यानं झाला, तर लगेच अमलात आणणं बरं !

कारण एखादी गोष्ट पटली, करायची ठरली, तिची निकड असली तरी, मन कोणते विचारांचे सापळे उभे करील याची कल्पना करणंही कठीण आहे. काही वेळा आपण पाहिलं असेल की, योग्य गोष्ट असली तरीसुद्धा मन म्हणतं, आपण जर याच्यावर थोडा अधिक विचार करायला वेळ दिला तर, हीच गोष्ट अधिक चांगल्या पद्धतीनं किंवा अधिक कौशल्यानं करण्याचे मार्ग सापडू शकतील. जे काम आज करण्यासारखं आहे, करणं हिताचंही आहे तेच उद्यावर ढकलण्याचे मनाचे हे फसवे मार्ग आहेत. आज भले चार पावलं टाकली असतील, चार कामं केली असतील, कदाचित त्यात एखाददोन त्रुटीही राहिल्या असतील, पण ती कामं - जर या मनाच्या फसवणुकीला आपण बळी पडलो नाही, तर निदान आज तेवढी कामं तरी झालेली असतील, ज्याला खूप महत्त्व आहे !

स्वामीजींच्या सांगण्यात आणखीही भावार्थ आहे. तो आपल्याला उपयोगी पडणारा आहे. आज जी परिस्थिती आहे, त्यात मला काम करण्यासाठी समजा एक तासाची अनुकूलता आहे, त्यात काही थोडं काम होऊ शकतं. आपण स्वामीजींच्या सल्ल्याकडं दुर्लक्ष केलं आणि मनाच्या नादानं ते काम उद्यावर ढकललं, तर काय सांगावं, उद्या कदाचित अचानक आलेल्या इतर कामांमुळं, परिस्थितीमुळं आज मिळू शकणारा एक तासही उद्या उपलब्ध नसेल. अशा वेळी 'करा, तेही आजच !' या वचनाचा फायदा काय ते अधिक कळेल, उपयोगी पडेल.

यात आणखीही एका गोष्टीचा विचार येतो, हे आपल्या लक्षात

येईल. आज आपल्याला जे काम पटलं, हिताचं वाटलं तेच उद्या मनाला तसंच वाटेल, याची खात्री देणं अवघड आहे. दुर्दैवानं तसं घडलं आणि ते काम हिताचं वाटलं नाही, निकडीचं वाटलं नाही तर, ते आपल्याकडून घडणार नाही, हे उघडच आहे. अशा प्रसंगात पटलेलं, हिताचं काम आजच करायचं आहे, असं समजून केलं असतं तर, निदान तेवढं तरी काम जमेला राहिलं असतं. उद्यावर ढकलल्यामुळं आपण त्यालाही मुकलो.

हेही लक्षात घ्यावं की, एखाद्या चांगल्या कामाची मनःस्थिती असताना ती मनःस्थितीच ते काम चांगलं नव्हे, अधिकाधिक चांगलं करण्याचे मार्ग सहजतेनं सुचवीत जाते. त्यावेळी त्या कामावर एकाग्रताही असते. त्यापोटी चांगलं काम तर घडतंच, पण त्याला अधिक दर्जाही येतो. आजच करण्याच्या भूमिकेमुळं, चांगलं काम हातावेगळं होतं. पूर्ण होतं. थोडे कष्ट घेऊन अशा 'आज करण्या'च्या भूमिकेमुळं आजचं पूर्ण काम हे नेहमी उद्याच्या चांगल्या कामाची सुरुवात ठरते.

हे काही केवळ, आधी म्हटलं तसं, काही विशिष्ट क्षेत्रांना लागू नाही. तो अभ्यास असेल, गुणवत्ता वाढवणं असेल, नव्या उद्योगाचा शुभारंभ असेल, एखादं प्रोजेक्ट पुरं करणं असेल, एखादी सेवा असेल, इतकंच काय आपला उद्धार करू शकणारं नामस्मरणही असेल ! तिथंही 'करा, तेही आजच !' हाच मंत्र हिताचा ठरेल.

याचं महत्त्व सर्वार्थानं पटायचं असेल तर, आपलं आयुष्यच नव्हे, उद्या-परवाच काय, आजचा श्वासही आपल्या हातात नाही, हे ध्यानी घ्यावं. म्हणजे मग स्वामीजी एकदा अशाच वचनात पुढं जाऊन जे म्हणाले,'आज नाही आत्ताच !' 'डू इट नाऊ ! ' हे तर त्याहीपेक्षा किती खरं आणि गरजेचं आहे, हे वेगळं सांगायला नकोच.

*

२.

ईश्वराचा नकारही आपल्याला होकाराइतकाच उपकारक असतो.

- श्री योगी अरविंद

प्रत्येक माणूस आपापल्या क्षेत्रात यशासाठी त्याच्यापरीनं प्रयत्नशील असतो. ती गोष्ट आवश्यकही आहे. आपोआप होण्याची वाट बघणारे किंवा आळसात राहाणारे जे काही लोक यशाची नुसतीच अपेक्षा धरून बसलेले असतात, त्यांना ते मिळणार नाही, हे उघड आहे. अशा लोकांपेक्षा हे रास्त प्रयत्न करीत असलेले लोक नक्की श्रेष्ठ होत.

प्रयत्न आणि त्याचा परिणाम म्हणून यश - याची एक निश्चित साखळी आहे. ती सांभाळणारी कार्यकारणभावाची - निसर्गाची - ईश्वराची यंत्रणा आहे. ज्यांच्या ती लक्षात आलेली आहे, त्यांना प्रयत्न करीत जात असताना त्यात्या टप्प्यावर, त्यात्या क्षेत्रानुसार तेवढ्यातेवढ्या यशाचे अनुभवही येत असतात. त्यानं उत्साह वाढून ते अधिक प्रयत्न करतात. त्यांची प्रगती सातत्यानं सुरू राहाते.

हे करणाऱ्यांच्या बाबतीत त्यांना येणारा एक अनुभव मात्र तसा सार्वत्रिक आहे. तो म्हणजे अशी कामं करीत असताना येणारी अपयशं, अडथळे. प्रयत्न करून ज्यावेळेला अपयश येत असतं, त्यावेळी त्यामुळं निर्माण होणारी निराशेची, वैफल्याची मनःस्थिती हीसुद्धा अनेकांना अनुभवायला येणारी गोष्ट आहे.

अशा प्रयत्नांमध्ये कुठल्यातरी टप्प्यात येणाऱ्या अपयशामुळं जी अस्वस्थता, निराशा येते, तिचं प्रमाण प्रत्येकाच्या त्यात्या वेळच्या गोष्टीप्रमाणं आणि त्याच्यात्याच्या मनाच्या ठेवणीप्रमाणं कमीजास्त असू शकतं. पण त्या अर्थानं अस्वस्थतेला पर्याय नसतो. त्याचा परिणाम म्हणून काही व्यक्ती तात्पुरत्या निराश होतात, खचतात. काही व्यक्ती त्या अपयशाची जबाबदारी दुसऱ्यांवर टाकतात, तर काही व्यक्ती मात्र त्या क्षेत्रातला प्रयत्न सोडून देण्याच्या मनःस्थितीपर्यंतसुद्धा जातात.

यांतला कुठलाही अनुभव असला आणि तो कुठल्याही क्षेत्राबद्दल असला, तरी तो नुकसानकारकच असल्यामुळं त्याच्यावर विचार करण्याची, मार्ग शोधण्याची गरज आहे, यात शंका नाही. अगदी साध्या उदाहरणानं पाहिलं तर गुणपत्रक हातात पडल्यावर विद्यार्थ्याला अनेकदा, त्याचा ज्या विषयात हातखंडा आहे, त्याच विषयात तुलनेनं इतर अवघड वाटणाऱ्या विषयांपेक्षा कमी मार्क पडलेले दिसतात.

ज्यांनी याच्यावर फारसा विचार केला नसेल, त्यांच्या प्रतिक्रिया - असं कसं काय झालं, बहुतेक आपला पेपर नीट तपासला गेला नाही, आपल्यावर अन्याय झाला आहे - अशा स्वरूपाच्या असतात. तर एवढ्या हातच्या विषयात कमी मार्क का पडावेत, याचंही अनेकांना आश्चर्य वाटतं, कोडं पडतं. खरं तर, जी यंत्रणा बाकीच्या विषयांना यथोचित मार्क देऊ शकते, ती यंत्रणा या विषयात चुकेल, असं व्हायचं काही कारण नाही. हे अशा अवस्थेत शांतपणे लक्षात घेतलं, तर त्या विषयात अपेक्षित वाटणारे जादा मार्क नाकारणाऱ्या यंत्रणेमागं काही कारणं आणि हेतू असतात, हे आपल्या लक्षात येऊ शकेल.

एवढ्या शांतपणे विचार केला आणि ते शोधून काढायचा प्रयत्न केला, तर लक्षात येईल की, जो विषय आपला हातखंडा विषय आहे, पूर्वी

त्यात आपल्याला चांगले मार्क मिळत होते, त्या विषयाची त्या वेळची तयारीही उत्तम होती, त्याचा परिणाम म्हणून आपल्या मनात तो विषय आपल्याला चांगला येतो, याच्याबद्दल एक प्रकारची बेसावधता आलेली असते. त्याचबरोबर यामुळं त्या विषयाच्या अभ्यासाकडं यावेळी दुर्लक्ष झालेलं असतं - हे आपल्या लक्षात येईल.

ही जी मूळ व्यवस्थित चालणारी आणि आपलं हित पाहणारी यंत्रणा आहे, तिनं आपल्याला जे अपेक्षित असलेले जादा मार्क देण्याचं नाकारलं आहे, त्यात त्या यंत्रणेत बिघाड तर नाहीच, तिच्याकडून कुठला अन्यायही नाही, उलट आपल्याला आपल्याच हितासाठी सावध करण्याची ती मदतच आहे. हे लक्षात आलं, तर आपण निराश होणार नाहीच, उलट सावध होऊ आणि पुढच्यावेळी आवश्यक ते प्रयत्न त्या विषयातही करू. अर्थातच, त्यावेळी आपल्याला चांगले मार्क जरूर मिळालेले असतील.

आधीच्या परीक्षेच्या वेळी आपल्याकडून झालेली बेसावधतेची, दुर्लक्ष करण्याची झालेली चूक - हा सारा विचार करून कृती केल्यामुळं आता सुधारली गेलेली असेल. आपल्याला त्यावेळेला नाकारलेले जादा मार्क, हे यंत्रणेचे आपल्यावर उपकारच आहेत, हे आपल्या लक्षात येईल. ते लक्षात घेऊन आपण पुढं सावधान राहिलो, तर आजही निराशेचं कारण उरणार नाही आणि पुढं पुन्हाही तसे नकारात्मक विचार आपल्या प्रगतीला खीळ घालणार नाहीत.

ही जी वस्तुस्थिती अशा एखाद्या साध्या उदाहरणात खरी आहे, हे लक्षात येतं, तिच्यामागचे यंत्रणेचे उपकार लक्षात येतात, तीच गोष्ट आयुष्यात अनेक क्षेत्रांत - करिअर, नोकरी, कुटुंब, उद्योगधंदे - अशा अनेक बाबतीत घडणाऱ्या आणि त्यावेळेला नकारात्मक वाटणाऱ्या प्रसंगांत खरी असते, हे आपल्या लक्षात येईल. याचं कारण असं की, आपल्या प्रयत्नांना जेव्हा पूर्ण

अचूकता येते, तेव्हाच आपल्याला त्यात्या क्षेत्रात उत्तम यश यंत्रणा देऊ इच्छिते. आपण जर धडपडतोच आहोत, तर आपण उत्तमांत उत्तम यश मिळवावं, अशीच तिची इच्छा असते आणि त्यासाठी आपल्याला वेळोवेळी अशी अपयशं किंवा यशाला नकार देऊनच ते साध्य होतं. मुलाला जर उत्तम घडवायचं असेल, तर आईसुद्धा लहानपणी चुकीच्या खाण्यावरून, बोलण्यावरून, वागण्यावरून जसं सावध करते, वेळी शिक्षा देते, तसं परमेश्वरही अशा पूर्णतेचे प्रयत्न करणाऱ्यांना, वेळी अपयश देऊन त्यांच्यातले दोष दूर करण्याचाच प्रयत्न करीत असतो.

हे लक्षात आलं, तर प्रयत्नांना येणारं अपयश आपल्याला खचवणार नाही. आपल्याकडून प्रयत्न सुटणार नाहीत. उलट, आपण सावध होऊन आपल्यात काय सुधारणा करायला हवी होती, ते शोधून काढू. त्यासाठी प्रयत्न करू आणि खऱ्या अर्थानं अधिक प्रगत आणि उत्तम होऊ. योग्य प्रयत्नांना यश देऊन, परमेश्वर जितका न्याय आणि आनंददायी होकार देतो, तितकाच तो आपल्याच प्रगतीसाठी आपल्या त्रुटी, उणिवा, चुका लक्षात याव्या म्हणून, वेळी त्यासाठी आपल्याला अपयश देऊन, सावधान करून आपल्यावर उपकारच करीत असतो.

याला आणखीही एक बाजू आहे.काही वेळा आपले प्रयत्न योग्य वाटले तरी,त्यामार्गानं जाण्यात पुढं आपलं काय नुकसान होणार याची कल्पना आपल्याला नसते. अशा प्रसंगीसुद्धा एखाद्या निर्णयात,क्षेत्रात,उद्योगात परमेश्वर आपल्याला यश द्यायला नकार देतो.त्यातही आपले प्रयत्न आपल्या अंतिम हिताचे व्हावेत,हाच त्याचा कल्याणकारी हेतू असतो.हे लक्षात घेतलं तर, त्यात्या ठिकाणी तिथंच थांबून आपण योग्य दिशेला लागू शकू.

अनेकदा एखाद्या क्षेत्रातल्या नोकरीचे आपण प्रयत्न करतो, त्याला यश येत नाही. परमेश्वर अर्थातच तिकडं जायला नकार देतो. अशा वेळी

शांत राहून आपला कल आणि कल्याण कशात आहे, हे हुडकून योग्य क्षेत्रात प्रयत्न केले, ते क्षेत्र आपल्या हिताचं असलं तर आपल्याला अनुभव येईल की, परमेश्वर या प्रयत्नांत मात्र यश देतो, होकार देतो.

अपयश देण्यात जसा परमेश्वराचा काही चांगला हेतू असतो, तसाच आपल्याला एखाद्या कामात होणाऱ्या विरोधाच्या बाबतीतही असतो. अनेकांना आपल्या प्रयत्नांना विरोध करणाऱ्या शक्ती म्हणजे एक विघ्न वाटतं. त्यामुळं अनेकांची मनःस्थितीही बिघडते.

यावेळी श्री अरविंद म्हणतात ते लक्षात घेणं आवश्यक आहे, की विरोध काय किंवा तो करणाऱ्या कुणी प्रातिनिधिक व्यक्ती काय, या त्या अर्थानं अडथळे किंवा वाईट गोष्टी नसतात, तर त्यामुळं आपल्यातल्या अप्रगत राहिलेल्या गोष्टींकडं आपलं लक्ष वेधलं जातं. प्रगतीसाठी धडपडणाऱ्या आपल्याला अशा तऱ्हेचा विरोध किंवा शत्रुत्व हीसुद्धा आपली सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यासाठी असलेली परमेश्वराची यंत्रणाच असते.

मनाचा समतोल, प्रयत्नांचा अचूकपणा, प्रयत्नातलं सातत्य, नम्रपणे अनुभवी माणसांची मदत घेण्याची प्रवृत्ती - अशा कुठल्यातरी बाजूंत, आपल्यात कमतरता असते किंवा निर्माण झालेली असू शकते. अशा वेळी विरोध, शत्रुत्व, अपयश या मार्गांनी निसर्ग किंवा परमेश्वर त्या कमतरतेचीच जाणीव आपल्याला करून देत असतो. ते कळून आलं, तर अशा कमतरतेकडं लक्ष जाऊन, सावध होऊन आपण ती दूर केली, तर त्यानं आपणच अधिक परिपूर्ण होतो, आपले प्रयत्नही परिपूर्ण होतात. अर्थात त्यामुळं अपेक्षित ते ध्येय गाठण्यात यशही येतं.

लौकिकबाबतीत कुटुंबातली कर्तव्यं, नोकरीत कामांची अपेक्षित पातळी, उद्योगात गरजेची नफ्याची पातळी - अशा कुठल्याही बाबतीत हा दृष्टिकोन लक्षात ठेवला, ईश्वरी यंत्रणेच्या हितबुद्धीची जाणीव ठेवली, तर

त्यात्या ठिकाणचं, अपयश, अडचणी, अडथळे - का उत्पन्न होतात ते लक्षात येईल. त्या त्या गोष्टींनी निराश न होता उलट, आपल्यातल्या सुधारणा करीत आनंदानं त्यांना सामोरं जाता येईल. त्यानं आपली मनःस्थिती तर चांगली राहीलच, पण इतर वातावरणही पोषक आणि अनुकूल राहील.

एक प्रश्न राहिला, तो अशा ईश्वरी नकाराच्या - अपयशाच्या प्रसंगी ते सारं कसं घ्यावं आणि निराशा कशी टाळावी, याचा. त्या बाबतीत इतिहासातलं उदाहरण लक्षात ठेवणं उपयोगी पडेल. पुढे यशस्वी विजेता म्हणून प्रसिद्ध असलेला सेनानी विल्यम्, हा ज्यावेळी मोहिमेसाठी पहिल्यांदा बोटीतून किनाऱ्यावर उतरला, त्यावेळी त्याचा तोल जाऊन तो किनाऱ्यावरच्या मातीत पडला. सामान्य माणसानं एकतर हा अपशकून मानला असता किंवा कदाचित पुढं आपल्याला यश येणार नाही, अशी समजूत करून घेऊन आपले प्रयत्न तिथंच सोडून दिले असते. पण अपयश, विरोध यांकडं बघण्याची यथायोग्य दृष्टी असल्यामुळं, पडल्यावर उठून उभं राहाताना विल्यम् म्हणाला, जी माती जिंकायला मी निघालो आहे, तिनं मला पुढच्या प्रयत्नांत लागणारी सावधानता शिकवली आहेच, पण त्याचबरोबर त्या मातीनं आपल्या स्पर्शानं माझं स्वागतही केलं आहे !

यात लौकिक प्रयत्नांतल्या यशाकडं वाटचाल करताना, अपयश स्वीकारताना लागणारा जो दृष्टिकोन त्याला यशस्वी व्हायला उपयोगी पडला, तो असा व्यावहारिक बाबतीत तर आपल्याला उपयोगी पडेलच,पण त्याहीपेक्षा खऱ्या अर्थानं मुक्तीची पारमार्थिक लढाई ज्याला जिंकायची असेल, त्याला परमेश्वर असे अधूनमधून देत असलेले नकारही सावधान करतील. योग्य आणि अचूक प्रयत्न करायला उपयोगी पडतील. त्यासाठी फक्त ही सारी यंत्रणा आणि तिची हितबुद्धी आपण लक्षात घ्यायला हवी !

*

३.

दोन माणसांपासून सावध राहावे.

- पू. तात्यासाहेब केतकर

तसे आपल्याला अनेक माणसं वेगवेगळ्या प्रकारचे सल्ले देत असतात. आजारपण, नोकरी, नातेवाईक - अशा अनेक बाबतीत असे सल्ले ऐकण्याची आपल्याला सवयही असेल. काही अनुभवामुळं असे ज्येष्ठ लोक जे सल्ले देतात किंवा मार्गदर्शन करतात ते ऐकून त्याप्रमाणं वागण्यानं आपला फायदा होतो, काही धोके टळतात. यश यायला मदतही होते.

हे जसं व्यवहारात, प्रपंचात खरं आहे, तसंच खरं मोलाचं मार्गदर्शन आपल्याला सत्पुरुषांकडून वेळोवेळी होत असतं. त्याच्याकडं लक्ष दिलं, त्यावर विचार केला, आपला अनुभव पाहिला, त्याची सत्यता तपासून पाहिली - पटली, प्रत्यक्ष तसं वागून पाहिलं, तर आपल्या लक्षात येतं, की त्यात आपलंच कल्याण झालं आहे.

त्यात पुन्हा सत्पुरुषांच्या सल्ल्याचं वैशिष्ट्य हे असतं की, सामान्य माणसाच्या - नातेवाईकाच्या रास्त सल्ल्यानं आपलं एखाद्या वेळेला प्रपंचातलं भलं होईल, पण सत्पुरुषांच्या सल्ल्यानं मात्र आपला प्रपंचही सफल होतो, स्वास्थ्य राहातं आणि पारमार्थिक कल्याणही होतं.

असाच एक छोटासा वाटणारा, पण आपल्या आयुष्यात पदोपदी मोलाचा ठरणारा एक सल्ला या संतवचनात आलेला आहे. व्यवहार करताना माणसाचा इतरांशी पदोपदी संबंध येणार, हे उघड आहे. त्यात संबंध येणारी माणसंही वेगवेगळ्या प्रकारची, किंबहुना अगणित प्रकारची असणार, हेही

गृहीत आहे. अनेक वेळी संबंध तात्कालिक असतात, कधी वरवरचे असतात, कधी ते बराच काळ टिकणारे आणि निकटचेही असू शकतात. संबंध एका अर्थानं अपरिहार्य असले, तरी काही प्रमाणात ते तसे आपल्या स्वाधीनही असतात. कुणाशी आणि किती संबंध ठेवावा, याचंही स्वातंत्र्य अनेकदा आपल्याला असतं. संबंधात संगत येते आणि त्या संगतीचा परिणाम आपल्यावर अनेकदा नकळत होत असतो.

तो तसा नकळत होत असतो, म्हणूनच त्या बाबतीत विचार करणं निवड करणं आणि सावधान राहाणं यांची गरज माणसाला आहे. मात्र ते वेळेत कळलं नसलं तर मनुष्याला नुकसान सोसावं लागतं. जसं एखाद्या व्यसनी माणसाच्या संगतीत राहायची वेळ आली आणि माणूस सावधान नसला तर तो स्वतःच कधी व्यसनी बनून जातो, हे त्याला कळतही नाही. अनेकदा तर पुढं होणारं नुकसान नंतर सावध झालं तरी टाळणं अवघड जातं. बहुधा ते अशक्यही असतं.

म्हणून या वचनात सावधान करताना पू. तात्यासाहेब म्हणतात, आपण दोन प्रकारच्या माणसांपासून सावध राहावं. त्यातले पहिले म्हणजे - विद्वान. वास्तविक प्रपंचातल्या लोकांच्या सांगण्याप्रमाणं विद्वानांच्या संगतीत राहावं, असा समज आहे, तसं सुभाषितही आहे. असं असताना हे का म्हटलं असावं, ते आपण समजून घ्यावं.

विद्वत्तेचं एक प्रकारचं आकर्षण सामान्य माणसाला असतं. पूर्वीच्या काळात शास्त्री-पंडितांची विद्वत्ता सामान्यांना आकर्षित करीत होती. आजच्या काळात डॉक्टर, इंजिनियर, वेगवेगळ्या क्षेत्रांतले तज्ज्ञ- अशा आधुनिक विद्वानांची विद्वत्ता सामान्य माणसांना आकर्षित करते. साहाजिकपणे आपणही तसं, शक्य त्या बाबतीत विद्वान व्हावं असं माणसाला वाटतं.वरवर पाहाता, यात तसं चुकीचं काही वाटत नाही. म्हणूनच या बाबतीत विचार करण्याची,

सावध राहाण्याची गरज आहे.

विद्वत्तेत एवढं सावधान असण्याची गरज का आहे, ते समजून घेऊ. विद्वत्तेबरोबर मान मिळतो, पैसा मिळतो, त्यात्या क्षेत्रानुसार उपदेश, प्रवचनं - अशा गोष्टी करण्याची नकळत उर्मी निर्माण होते. साध्या माणसाकडं शिकण्याची जी एक वृत्ती असते, त्यासाठी लागणारी नम्रता असते, भावना शुद्ध असतात - नेमका त्यांचाच अभाव विद्वानांच्या ठिकाणी असलेला आपल्याला आढळून येईल.

अशी व्यावहारिक क्षेत्रातली विद्वत्ता माणसाच्या ठिकाणी या साऱ्या चांगल्या गोष्टी तर घालवीत जातेच, पण त्याचबरोबर उलट, इतरांना तुच्छ लेखण्याची, कुणावर टीका करण्याची, कुणाशी वादविवाद करण्याची प्रवृत्ती बळावते. हळूहळू अशा विद्वत्तेनं अहंकार बळकट होतो.त्यामुळं मग होणारं नुकसान प्रापंचिकही असतं आणि पारमार्थिकही. प्रपंचात मीपणामुळं माणसं दुरावतात, तर परमार्थात मीपणामुळं भगवंत अंतरतो. शिवाय मुळात ही कुठलीही लौकिक विद्या अपूर्ण असल्यामुळं, विद्वानाला स्वतःलाच आतून खरं समाधान लाभत नाही. विद्वत्तेच्या अनेक क्षेत्रांत तर परिपूर्णताही नाही आणि निश्चिततही नाही.त्यामुळं विद्वत्तेचा गर्व सांभाळताना तारांबळ उडते.

म्हणून यात सावधान राहाण्याचा सल्ला देताना, पू. तात्यासाहेब म्हणतात अशांच्या संगतीत राहिलं, तर नको असलेल्या गोष्टी अंगी येतात आणि हवा असलेला भगवंताचा संबंध दुरावतो. त्यात पुन्हा विद्वानांच्या बाबतीत एक मोठं लक्षणीय, पण धोकादायक वैशिष्ट्य आपल्याला जाणवून देताना ते म्हणतात की,विद्वानांत सहजपणे एक दंभ शिरतो.त्यापोटी विद्वान स्वतः समाधान मिळवण्याच्या बाबतीत फसलेला असूनही फसलेला नाही, असं दाखवतो. संगतीत राहिलं तर आपलं हेच होईल,यातलं नुकसान उघड आहे. विद्वत्तेत मीपणा बळकट असल्यामुळं परमेश्वराच्या कर्तृत्वाची जाणीव

राहात नाही. त्यावर श्रद्धाही नसते. त्यामुळं ज्याला पारमार्थिक प्रगती करून घ्यायची आहे, तो जर अशा सहवासात राहिला, तर त्याची असलेली श्रद्धासुद्धा ढासळण्याचा धोका असतो, म्हणून सावधान असावं.

असंच दुसऱ्या एका वर्गाबद्दलही सावधान राहायला यात सुचवलं आहे - तो वर्ग म्हणजे श्रीमंतांचा वर्ग. या वर्गातले लोकही डोक्यात सतत पैशाचे आणि त्यामुळं त्यांना मिळालेल्या मानमान्यतेचे बळी असतात. सामान्य माणसाला पैशाचं आणि त्यामुळं अशा श्रीमंतीचं नकळत महत्त्व वाटतं. तो त्यासाठी धडपडतोही. व्यवहार चालण्यापुरत्या पैशाची गरज ही काही कुणी अमान्य करीत नाही. पण श्रीमंती हेच अशा गरजांपलीकडं पैसा गोळा करण्याचं लक्षण आहे. एकदा असं झालं की, मग माणसाला पैशापुढं इतर माणसं, त्यांच्या गरजा, त्यांच्या अडीअडचणी, त्यांना मदत करण्याची कर्तव्यं - अशा अनेक गोष्टी दिसत नाहीशा होतात.

श्रीमंतांना व्यवहारात मान असल्यामुळं साहाजिकच सामाजिक प्रतिष्ठा, रुबाब, श्रीमंती मिरवण्याची हौस - अशा अनेक गोष्टी आपोआपच घडतात. पैसा असला म्हणजे त्याचा नकळत आधार वाटतो. त्यापोटी देवधर्म तर सोडाच, पण नातेवाईक, मित्रमंडळी यांचीही किंमत उरत नाही. मुळात असा अती पैसा असला आणि त्या अर्थानं आणखी काही मिळवायची कुठलीही गरज नसली तरी, पुढं येणाऱ्या प्रत्येक व्यवहारात,संबंधात पैशाच्या दृष्टीनं आपला फायदा होईल ना,हाच विचार मनात वावरू लागतो. त्यामुळं सन्मार्गी माणसं सहसा अशा श्रीमंतांपासून दूर राहातात. अर्थात श्रीमंतांना त्यातला तोटाही लक्षात येत नाही. उलट, त्यांचं आणि त्यांच्या श्रीमंतीचं कौतुक करणाऱ्या लोकांच्या वर्तुळात वावरणं त्यांना आवडू लागतं. अशा कारणांसाठी जवळ येणारी माणसं सहसा सत्प्रवृत्त नसतात,उलट या श्रीमंतीवर स्वतःची काही कामं करून घेणारी असतात,तर काही असत् प्रवृत्त, व्यसनी

अशीही माणसं जवळ येतात. यात डोळ्यावर असलेल्या श्रीमंतीच्या धुरापोटी श्रीमंत माणसालासुद्धा सहजपणे व्यसनाला बळी पडायला होतं. देवधर्माची माणसं, सात्त्विक विचारी लोक यांची संगत श्रीमंतांना मार्गावर आणू शकते. पण तेही या साऱ्यामुळं दूर जातात. श्रीमंतांची पुढची दुर्दशा यथाकाल, पिढयान्‌पिढ्या होत असते.बेसावधपणामुळं होणारा त्रास,दुःख अटळ असतं.

श्रीमंती म्हणजे गरजेपेक्षा अवाजवी आणि अमाप पैसा मिळणं. या वचनात पुढं लक्षात आणून दिलं आहे की, कुणालातरी लुबाडल्याशिवाय, कुणावर तरी अन्याय केल्याशिवाय मनुष्य, असा सहसा श्रीमंत होऊ शकत नाही. मग तो कमी मोबदल्यात तिकडं भरपूर नफा कमावणारा व्यापारी असो, उद्योजक असो किंवा अवैध मार्गानं पैसा गोळा करणारा कुणी असत् प्रवृत्त - गुंड असो. जगातले बरेचसे व्यवहार सामान्यतः पैशावर चालू असल्यामुळं पैशाचा आधार वाटतो. जितका जास्त पैसा तितका जास्त आधार वाटतो. पैसा माणसाला सुरक्षिततेचा एक भ्रम निर्माण करण्यात फार यशस्वी होतो, असंही आपल्याला आढळून येईल. आपल्याला कुठलीच अडचण पैशामुळं येणार नाही, अशी श्रीमंतांची समजूत असते.

वास्तविक अशा असंख्य गोष्टी असतात, असंख्य आपत्ती असतात, की, कितीही श्रीमंत असलेला मनुष्य त्या चुकवूही शकत नाही आणि त्या दूर करायला त्याचा तो पैसाही उपयोगी पडत नाही. अपघात, अकाली मृत्यू असाध्य आजार, नैसर्गिक आपत्ती - या सर्वांना सारख्याच येत असतात.

फरक पडतो तो इथं की, सामान्य माणसाला, सश्रद्ध माणसाला अशा प्रसंगी,प्रसंग तोच असला तरी श्रद्धेचा आणि भगवंताचा भक्कम आधार असतो. त्यामुळं तो फार विचलित होत नाही, धीरानं सामोरा जातो.जे शक्य असेल ते करतो आणि अखेर जे होईल ती भगवंताची इच्छा आहे आणि ती कल्याणाचीच आहे, या भावनेनं आपल्या आयुष्याची पुढची वाटचाल धीरानं

आणि पूर्ववत सुरू ठेवतो.

याउलट श्रीमंत, सुखवस्तु आणि त्यामुळं ऐषआरामात राहाणारा मुळात भगवंताला मानीतच नाही. खऱ्या अर्थानं सश्रद्धही असत नाही. तो काही देवाधर्माचं करताना दिसत असला तर, आपल्या श्रीमंतीला कुठला धोका उत्पन्न होऊ नये म्हणून, भीतीपोटी ते करीत असतो. पण त्याला खरा आधार वाटतो तो पैशाचाच. पण आधी उल्लेख केला तशा प्रसंगात हा त्याचा एकमेव आधार कोसळतो. अशावेळी अशी अनेक श्रीमंत माणसं कोलमडून पडतात. निराशेच्या गर्तेत जातात. काही व्यसनात बुडून उरलेल्या आयुष्याचंही नुकसान करून घेतात.

आता त्यांचं जे हे होत असतं,ते जर आपल्या लक्षात आलं आणि संतांच्या सल्ल्याचं मोल कळलं, तर निदान श्रीमंतांच्या सहवासाबद्दल आपण सावध राहून आपलं नुकसान टाळू शकू. आपल्या लक्षात येईल की, श्रीमंतांच्या क्वचित होऊ शकणाऱ्या मदतीपेक्षासुद्धा श्रद्धेनं भगवंताची होणारी मदत कधीही, कुणालाही अधिक अचूकपणे आणि नक्की होत असते.

यात एक लक्षात घेण्यासारखं आहे की, विद्वान आणि श्रीमंत यांच्यापासून सावध राहाणं म्हणजे त्या गोष्टींना किंमत नाही, असं नव्हे. ज्ञान माणसाला गरजेचंच आहे. पाण्यावर नाव चालावी, तसं ते त्याचं आयुष्य सुखरूपपणे चालायला मदत करतं. पण आधी उल्लेखलेली विद्वत्ता म्हणजे नावेत शिरलेलं पाणी आहे. त्यानं कदाचित काही काळ भपक्याचा जातोही, पण समाधानाच्या पैलतीराला अशी नाव कधीच पोचत नाही. तीच गोष्ट गरजेसाठी लागणाऱ्या पैशाचीही आहे. तोही जरुरीपुरता असला, तर नुकसान करीत नाही. पण लोभ लागून अमाप झाला, तर आपल्याला बुडवल्याशिवाय राहात नाही. म्हणून विद्वान आणि श्रीमंत यांच्यापासून सावधान राहाणं आपल्याच हिताचं आहे !

*

४.

तळमळ असणे चांगले,
पण अधीरपणा वाईट.

- श्री योगी लेले महाराज

प्रत्येक माणसाला, तो जर आपल्या मनुष्य जन्माविषयी सावध असेल, तर अधिकाधिक चांगली ध्येय समोर येत असतात. एका बाजूला त्याला त्याच्या वैयक्तिक जीवनातल्या कामांतही काही ध्येय अपरिहार्यपणे असतातच. उदाहरणार्थ, तो नोकरी करीत असेल किंवा कुठं उद्योगाला जात असेल, तर त्या ठिकाणी वेळेत पोचणं, हे त्याचं अगदी दैनंदिन आणि महत्त्वाचं ध्येय असतं. त्यात्या गावाच्या किंवा महानगराच्या राहाण्याच्या ठिकाणाप्रमाणं हे ध्येय गाठण्याची साधनं अर्थातच वेगवेगळी असतात. कधी चालत, कधी सायकलवर, कधी बाईकवर, कधी बस तर कधी लोकल असं कुठलंही वाहन असलं, तरी ते वेळेत गाठणं आणि आपल्याआपल्या कामाच्या ठिकाणी वेळेत पोचणं - हे तसं सर्वांनाच लागू असतं.

इथंच नेमकी मनाची थोडी परीक्षा होऊन जाते. त्यासाठी काही तत्त्वंही लक्षात ठेवावी लागतात. गडबड झाली म्हणून खाली न बघता भरभर चालण्याच्या नादात ठेच लागणं काय, बाईकचा वेग वाढणं - असुरक्षितपणे ओव्हरटेक करण्याचे प्रयत्न करणं काय किंवा निघालेल्या बसमध्ये पळत जाऊन गर्दीत त्यात पाय टाकण्याचा प्रयत्न करणं काय किंवा समोर दिसणारी लोकल काही सेकंदात जाणार, हे लक्षात येऊन रीतसर जिन्याचा मार्ग टाळून

रूळ क्रॉस करून जाऊन ती पकडण्याचा प्रयत्न करणं काय - अशा अनेक प्रसंगी वेळेत पोचण्याचा गुण हा वक्तशीरपणा म्हणून, शिस्त म्हणून चांगला असला, तरी वेळेचं गणित चुकलेलं असेल, तर तेच ध्येय गाठताना तळमळीऐवजी अधीरपणाला बळी पडायला होतं. त्यातून साध्या अपघातापासून मृत्यूपर्यंत कशालाही सामोरं जावं लागतं. हे आजवर हजारो वेळा घडलेलं आणि बहुतेक सर्वांना ठाऊक असलेलं सत्य आहे.

तरीही यात तळमळीवर आणि त्याच्यासारख्याच वाटणाऱ्या, पण अवगुण असलेल्या अधीरपणावर निदान कधी मोकळ्या वेळेतसुद्धा विचार केला जात नाही. काही वेळा तर वक्तशीरपणाचा किंवा शिस्तीचा गुण पाळण्यासाठी असे अधीरपणाचे प्रयत्न मनाला रास्तसुद्धा वाटतात. शांतपणानं यावर विचार करण्याची गरज अशासाठी आहे की, मुळात ही जी धावपळ झालेली असते, तिला कुठली परिस्थिती कारणीभूत असण्यापेक्षा आपलंच सकाळपासूनचं वेळेचं, कामांचं नियोजन चुकलेलं असतं, हे खरं आहे असं आढळून येईल. क्वचित अचानकपणे उद्भवणारी कामं हा अपवाद कधी होत नाही असं नाही, पण तो अपवाद असतो. बाकीच्या दिवशी आपल्या नियोजनातल्या ढिलाईच जास्त असतात. अनेकदा तर अशा अपवादभूत परिस्थितीतसुद्धा काही कामं टाळून आपण सुरक्षित वेळ जपू शकतो. अर्थातच त्यामुळं या अधीरपणाला आणि त्यामुळं निर्माण होणाऱ्या दुःखांना सामोरं जावं लागणार नाही.

ही गोष्ट तशी साधी वाटते, पण त्यावर जर विचार केला तर खऱ्या तळमळीनं आपलं चित्त स्वस्थ असतं, नियोजन अधिक सफाईदार असतं, यशाची चिंता नसते, तर तळमळीचा मूळ हेतूही साध्य होतो. उलट अधीरपणामुळं चित्त नेहमी अस्वस्थ राहातं, नियोजनात गोंधळ असतो. कमी महत्त्वाची कामं उगाचच केली जातात.महत्त्वाची राहून जातात. चित्ताला

यशाची सतत काळजी राहाते. हेतू साध्य होईल की नाही, याची अकारण भीती वाटत राहाते. हेतू साध्य करताना, या अधीरतेमुळं होणारे आधी वर्णन केलेले धोके नव्या अडचणी उत्पन्न करतातच. शिवाय तळमळीच्या निश्चित प्रयत्नानं, शांतपणानं ज्या प्रमाणात हेतू साध्य होतात, त्याचा विचार करता अधीरपणामुळं जेवढे हेतू-ध्येयं साध्य होतात ते प्रमाण खूप कमी असतं. अनेकदा ती साध्य होतही नाहीत. उलट इतकी धावपळ करून पुन्हा उशीर झाला,याची खंतच दिवसभर पाठलाग करीत राहाते, अपराधी वाटत राहातं.

हे एक साधसं उदाहरण एका छोट्या, रोजच्या ध्येयाबद्दल जरा बारकाईनं बघितलं आहे. पण आपल्या लक्षात येईल की, ते अशा साध्या गोष्टींपासून ईश्वरप्राप्तीच्या सर्वोच्च ध्येयापर्यंत सर्वत्र त्यात्या प्रकाराप्रमाणं लागू आहे.

आपल्या लहान मुलाची आयुष्यात पुढं उत्तम प्रगती व्हावी, याची तळमळ असणं, हे कुठल्याही आईच्या दृष्टीनं स्वाभाविक आहे. तिचं ते कर्तव्यही आहे, तो एक गुणही आहे. त्यासाठी शांतचित्तानं विचार करून प्रयत्न करीत राहावं लागतं, हेही खरं आहे. पण शाळेत घातल्याच्या दुसऱ्या दिवसापासूनच, रोज शाळेत जाऊन जर त्याची प्रगती होते आहे की नाही, हे पाहतात. खरंतर, अर्थातच तशी ती काही अशी रोज घडणारी गोष्ट नसते. उलट अशा तऱ्हेनं केले जाणारे प्रयत्न त्या मुलाला, त्याला शिकवणाऱ्या शिक्षकाला, त्याची तुलना ज्या इतर मुलांच्या प्रगतीशी रोज केली जाते त्या मुलांना, त्यांच्या पालकांना - सगळ्यांनाच त्रासदायक ठरतात. तळमळ असली तरी शेतात पेरलेलं बी उगवून यायला, जसं रोज शांतपणे पाणी घालावं लागेल, निगराणी करावी लागेल, कधी ते सारं हवा-पाणी-ऊन यावर सोडून, शांतपणे आपल्या आपल्या कामात राहावं लागेल - मग योग्य वेळी त्याला आलेला अंकुर जमिनीतून अलगद वर आलेला दिसतो,

त्यावेळी होणारा आनंद हा तळमळ, त्यात लागणारा धीर आणि योग्य प्रयत्न यांचं प्रतीक असतो, जे आदर्श असतं. आधी म्हटले ते प्रयत्न बी लावल्यावर, रोप लावल्यावर रोज उठून ते उकरून पाहाण्यासारखे हानिकारक आणि अर्थातच त्यामुळं अधीरपणाचे ठरतात.

तीच गोष्ट एखादा खेळ शिकणाऱ्याची असू शकते, तीच गोष्ट एखादं वाद्य, एखादी कला शिकणाऱ्याची असू शकते. तिथंसुद्धा ते यावं, ही गोष्ट सात्त्विक आणि चांगली असली तरीही, तिथंही अधीरपणा करणारे सहसा त्या गोष्टी साध्य करू शकत नाहीत असं आपल्या लक्षात येईल. उलट अशा तळमळीत अपेक्षित असलेला धीर दाखवणारे, यशाचे विचार मनातून काढून टाकून, सातत्यानं आवश्यक ते प्रयत्न करणारे लोक, अशी ध्येय गाठताना आपल्याला दिसतील.

काही कारणानं एखाद्याला काही आजार किंवा व्याधीला सामोरं जावं लागलं, तर त्याचं दुःख असतं. कदाचित ती व्याधी वाढत जाते, अनेक दिवस चालते. व्याधीतून मुक्त व्हावं, निरामय असावं याची तळमळ वाटणं स्वाभाविक आहे. पण त्यात्या व्याधीप्रमाणं तिचं योग्य निदान होणं, त्यावरचे तज्ज्ञ भेटणं, योग्य औषध उपलब्ध होणं, त्यांनी दिलेल्या प्रमाणात आवश्यक तेवढा काळ - कदाचित तो काळ प्रदीर्घही असू शकतो - ते घेत राहाणं, त्यासाठी लागणारी पथ्यं काळजीपूर्वक आणि सातत्यानं पाळणं अशा अनेक धीराच्या गोष्टी केल्या, तर बरं होण्याच्या आपल्या तळमळीला यश येऊ शकतं. याउलट, अनेकांना आजाराची नुसती जाणीव होताच किंवा त्याचं निदान होताच,ते केव्हा बरं होईल, याचा अधीरपणा येतो. त्यापोटी औषधांसाठी धावणं, डॉक्टर्स बदलणं, अनेक प्रकारच्या पॅथींचे प्रयोग करीत राहाणं-या सगळ्यांत औषधं घेण्याची,पथ्याची नियमितता न राहाणं, त्यामुळं अर्थातच रोग बरा होत नसल्यामुळं,त्याची काळजी उत्पन्न होऊन,रोग आणखीच

वाढणं - असे असंख्य दुष्परिणाम या आजारातून बरं होताना अधीरपणाच्या वृत्तीमुळं घडतात. म्हणून लेले महाराज जे म्हणतात, त्याकडं लक्ष देणं आवश्यक आहे. ते त्या अधीरपणाला वाईट म्हणतात.

आपल्या नेहमीच्या आयुष्यातल्या अनेक बाबतीत हे वचन लागू असलेलं आपल्या लक्षात येईल. अनेकांना परीक्षेत यश हवं असतं. ती गोष्ट चांगली आहे, स्वाभाविकही आहे. पण त्यासाठी तळमळ बाळगून योग्य आणि सतत प्रयत्न करणं, वेळी आवश्यक मार्गदर्शन घेणं, सराव करणं - असे धीराचे प्रयत्न या तळमळीला यश आणायला नेहमीच अधिक उपयोगी ठरतात. याउलट यशाच्यासाठी अधीर होऊन हा क्लास-तो क्लास, हे अपेक्षित-ते अपेक्षित, याचं गायडन्स-त्याचं गायडन्स, असे अनेक धडपडीचे आणि उलाढालीचे मार्ग चालणाऱ्यांना त्या प्रमाणात कमी यश मिळतं - असं आपल्याला आढळून येईल.

हे तर साध्यासाध्या बाबतीत आढळतंच. पण जिथं जीवनमरणाचा प्रश्न आहे, देशाच्या, सीमेच्या सुरक्षिततेचा प्रश्न आहे, तिथं त्याची तळमळ असणं, हा तर जीव पणाला लावून अमलात आणण्याचा सद्‌गुण आहे. सीमेवर तर आपल्या बरोबर शत्रूच्याही हालचाली, डावपेच सुरू असतात. यशापयशाचा सामना करावा लागत असतो. त्यात जर या तळमळीऐवजी आपण चुकून अधीरपणाला बळी पडलो, तर कदाचित एखादी तात्पुरती लढाई जिंकली जाईल, पण युद्ध मात्र हरली जातात. त्यातही अधीरपणानं मनुष्य रागाच्या किंवा त्वेषाच्या आहारी गेला, तर होणारं नुकसान स्वतःचंच असतं. हे आपल्याला इतिहासानं अनेकदा दाखवून दिलेलं आहे.

जी गोष्ट व्यवहाराला एवढी व्यापून आहे, सत्य म्हणून प्रत्ययाला येते आहे, तिची व्याप्ती परमार्थात तर फार मोठी आहे. तिथं असे साधे तात्कालिक प्रसंग किंवा वेळी आधी म्हटले तसे अधिक गंभीर - जिवावरचे

प्रसंग नसून माणसाच्या उद्धाराचा अंतिम प्रश्न आहे. ते तर तसं सर्वांत मोठं ध्येय आहे. त्याची तळमळ उत्पन्न होणं, हेच मुळात अनेक जन्मानंतरचं भाग्य आहे. त्यासाठी लागणारी तळमळही तितकीच सखोल, टिकाऊ असावी लागते, हे उघड आहे.

पण असे परमार्थातले मुक्तीसाठीचे प्रयत्न करतानासुद्धा हा अधीरपणाचा अडथळा अगणित लोकांना येतो.त्यांना वाटतं मी इतकं चांगलं ध्येय ठेवलं आहे, त्यासाठी मला तळमळ वाटते आहे, मी गुरूंचं मार्गदर्शन घेतो आहे, काही साधन-नाम घेतो आहे, आता माझा उद्धार लगेच व्हावा, ही अपेक्षा स्वाभाविक वाटली, तरी त्यात अधीरपणाचा दोष आहे.

उद्धार-मुक्ती ही जर मानवी जीवनाची अंतिम ध्येय आहेत, तर त्यासाठी लागणारी तळमळ आणि अर्थातच त्यात अभिप्रेत असलेला धीर-सबुरी किती मोठ्या प्रमाणात आणि मोलाची असेल, याची कल्पना करावी. साधनेत सांगितल्याप्रमाणं करणं, जे टाळायला सांगितलं आहे, ते कटाक्षानं टाळणं, ईश्वरावरची निष्ठा कसल्याही प्रसंगात अढळ असणं, गुरूंबद्दल निःसंदेह असणं, त्यांच्या आज्ञापालनात टिकून राहाणं, सारे प्रापंचिक प्रसंग घडत असताना निरपेक्ष राहाण्याची पराकाष्ठा करणं - इतकंच काय उद्धाराच्या बाबतीतसुद्धा तो भगवंतावर सोडण्याइतपत निरपेक्षता टिकून राहाणं - अशा अनेक पातळ्यांवर परमार्थातला प्रवास सुरू असतो. तीच गोष्ट इतर मार्गांना - योग, कर्म, ज्ञान - यांतही लागू असते.

पण यात पटकन परमेश्वरप्राप्तीचा अधीरपणा असाच अडचणीचा आणि त्यामुळं घातक ठरतो. म्हणून एकूणच तळमळ-तळमळीमागचा धीर, प्रयत्नांतलं सातत्य हे चांगलंच, पण यशाबद्दलचा अधीरपणा मात्र वाईट - हे महाराजांचं म्हणणं किती सत्य व गरजेचं आहे, ते पटेल !

*

५.

शिष्याची बुद्धी जितकी प्रखर
तितकी त्याची साधक म्हणून पात्रता कमी.

- श्री निसर्गदत्त महाराज

आपल्याला बुद्धीचं मोठं कौतुक आहे. बुद्धिमान माणसांना जगात मानही आहे. बुद्धीची अधिकाधिक वाढ व्हावी, म्हणून अनेक जण प्रयत्नशील असतात. बुद्धिमान माणसांना जगात अनेक क्षेत्रांत यश मिळतानाही आपण पाहातो. हे आपल्या डोळ्यांसमोर असताना श्री निसर्गदत्तांसारखे आत्मज्ञानी पुरुष प्रखर व जास्त बुद्धीचा ज्यावेळेला, अशा तऱ्हेनं व्यक्तीची पात्रता कमी समजण्याबद्दल थेट उल्लेख करतात, त्यावेळी यावर आपण विचार करण्याची गरज नक्कीच आहे. ती शिष्य या संदर्भात पाहाण्यापूर्वी या वचनाचा थोडा व्यावहारिक पातळीवरचा अर्थ पाहू.

एखादं चौथऱ्याचं किंवा भिंतीचं गवंडीकाम चालू असूदे किंवा एखाद्या ऑफिसमध्ये कुणी अधिकारी कुणा कर्मचाऱ्याला काही काम सांगत असूदे किंवा एखादा दुकानदार हाताखालच्या नोकराला दुकानातल्या देवघेवीसंबंधी काही काम सांगत असूदे, आपण सामान्य अनुभव पाहावा.

गवंडीमामांनी गड्याला मध्येच ओळंबा मागितला किंवा थोडं कोरडं सिमेंट मागितलं की, सामान्य गडी लगेच ते उचलून त्यांना देतो. उलट स्वतःला कामाचा अनुभव आहे असं समजणारा गडी पटकन ती वस्तू देण्याऐवजी आधी 'आत्ता कशाला?' म्हणून विचारील. त्यात गवंड्याच्या

कामाचा खोळंबा होईल, ते का ते समजावून देण्यात वेळ जाईल, काम मागं पडेल, कदाचित ती गोष्ट जलद किंवा वेळेत करण्याची असेल तर ती वेळही या समजावून देण्याच्या उद्योगात पुढं जाईल आणि कामाचं नुकसान होईल.

आता या ठिकाणी मूळ काम सांगितल्यावर ते पटकन केल्यानं होणारा फायदा आणि ते का आणि कशासाठी याच्या चौकशीत वेळ गेल्यानं होणारं नुकसान उघड आहे. प्रश्न हा आहे की, हे नुकसान कशामुळं झालं. तर त्यावेळी गरज नसताना ज्या गडीमाणसाच्या बुद्धीनं हे प्रश्न उपस्थित केले, त्यामुळं हे नुकसान झालं. त्यात पुन्हा मूळ कामाची जबाबदारी त्या गवंडीमामांच्यावर असल्यामुळं ते सारं नुकसानही शेवटी मालकाकडून त्यांच्यावरच लादलं जाणार. त्यालाही कारण मुळातली ही बुद्धीच होय.

वास्तविक ज्यांच्यावर जबाबदारी आहे, त्यांनी ज्यावेळेला ही कामं सांगितली, त्यामुळं मूळ कामही अधिक चांगलं होणार होतं, तेव्हा त्यांनी वापरली तीही बुद्धीच. फक्त त्यांच्या ठिकाणी पुरेसा अनुभव आणि जबाबदारी असल्यामुळं ती बुद्धी, कामं जलद व चांगली होण्यासाठी वापरली गेली.

म्हणजे व्यवहारात बुद्धी गरजेची किंवा उपयोगाची नाही असं नाही.तिला एक स्थान,मर्यादा आहे. पण त्या स्थानावर आणि जरूर तेवढीच ती वापरली गेली,तरच तिचा फायदा आहे. हे सांभाळलं गेलं नाही,तर तीच बुद्धी दुधारी शस्त्रासारखी, त्यात्या ठिकाणी-त्यात्या प्रमाणात, माणसाचा फायदा करून देण्याऐवजी त्याचंही नुकसान करते, इतरांचंही आणि कामाचंही.

याचा अर्थ बुद्धीचं स्थान आहे, पण ते तिच्या जागीच आहे. आपण जर गडीकाम करतो आहोत, तर तिथं जर ही अशी बुद्धी वापरली, तर ती प्रखर म्हणजे त्या अर्थानं अनाठायी आणि नुकसानकारक ठरते. हे साध्या एवढ्याशा व्यवहारात आणि कामातल्या एक-दोन गोष्टी ऐकण्यात होत असेल,तर अशी प्रखर म्हणजे अनावश्यकपणे वापरली जाणारी बुद्धी, एकूण

आयुष्यात किती नुकसान करू शकत असेल, याची आपण कल्पना करावी.

जी गोष्ट या साऱ्या बांधकामाच्या ठिकाणी, एखाद्या दिवशी, एकदोन गोष्टी ऐकण्यात झाली, ती या सबंध बांधकामात रोज घडली, तर असली बुद्धिमत्ता अशा प्रखर बुद्धीच्या गड्याची नोकरी घालवण्याचीच शक्यता जास्त. जे इथं घडणार, तेच आधी म्हटल्याप्रमाणं ऑफिसमध्ये, दुकानात घडणार. आपण सामान्य माणसंही असं काही घडताना दिसलं,तर ते करणाऱ्या माणसाला साध्या भाषेत 'आगाऊ' म्हणतो. त्याचा अर्थ शेवटी प्रखर बुद्धिमत्ता ही शिकताना, पुढं जाताना, प्रगती करताना अडचणीची ठरते.म्हणजेच ती शिकणाऱ्याची पात्रता वाढवीत नाही, कमी करते, त्याचं नुकसान करते.

क्षणभर आपण आणखी एक उदाहरण पाहू. रेल्वेच्या महत्त्वाच्या ठिकाणी सिग्नल देण्याची यंत्रणा असते. त्या मार्गावरून जाणाऱ्या गाडीच्या वेळेची, गतीची, गाडीच्या मागच्या आणि पुढच्या रुळांवरच्या गाड्यांची-अडीअडचणींची कल्पना त्या यंत्रणेतल्या माणसांना असते. एवढी मोठी रेल्वे कौशल्यानं, वेळा सांभाळून रोज नेणारे रेल्वेचे मोटरमन-रेल्वेचालक हे काही कमी बुद्धिमान नसतात. पण म्हणून एखाद्या वेळेला सिग्नल नसला तरी, त्याला काय होतंय, मागंपुढं काही धोका दिसत नाही, असं म्हणून आपल्या बुद्धीच्या जोरावर गाडी तशीच पुढं नेली, तर हजारो प्रवाशांचे प्राण, असली बुद्धिमत्ता धोक्यात आणू शकते. सिग्नल मिळालेली गाडी रुळांवर किती वेगानं नेऊन वेळेत इच्छित ठिकाणी पोचवावी, हा मोटरमनचा विषय असला, तरी ती पुढं जाऊ द्यावी की नाही, हा सिग्नलमनचा विषय आहे.

म्हणजे आपल्या कामाच्या विषयाबाहेर जाऊन किंवा अनुभवाचा अतिरिक्त आत्मविश्वास बाळगून, इतरांच्या अनुभवाची जरूर असलेली कदर न बाळगणारी, अनाठायी शंकेखोर-जिज्ञासू, अधिक अनुभवी माणसांची वचनं न मानणारी - अशी जी बुद्धी, ती या अर्थानं प्रखर आणि प्रगतीच्या

बाबतीत आपली कुवत - म्हणजेच पात्रता कमी करणारी आहे.

हे जर आपल्या व्यवहारात अनुभवायला येत असेल, तर ज्या ठिकाणी सूक्ष्माशी संबंध आहे, अनेक प्रकारची तपश्चर्या करण्याचा प्रश्न आहे, उत्तम तळमळीची गरज आहे, जो विषय मुळातच मानवी बुद्धीच्या पलीकडचा आहे, जाणायची गोष्ट प्रत्यक्ष अनुभवाचा-कृपेचा विषय आहे - अशा भगवंताच्या - स्वरूप साक्षात्काराच्या बाबतीत असली प्रखर बुद्धिमत्ता अडचणीची ठरली नाही, तरच नवल.

या बाबतीत खरंतर अडचण ही, की आज्ञापालनात असली बुद्धिमत्ता आड येते. गुरू अनुभवी असल्यामुळं त्यांच्या आज्ञापालनाशिवाय शिष्याचं कामंही कधी होणार नसतं. त्यात अशा प्रखर बुद्धिमत्तेनं अविचल श्रद्धा डळमळते. त्याचबरोबर गुरूंच्या आज्ञेवर आपली बुद्धी चालवून, ते चुकीचं ठरल्यास, त्यांच्याकडून आज्ञापालन होत नाही. अशी प्रखर बुद्धिमत्ता असलेले शिष्य पात्रतेत का कमी पडतात, यावर श्री निसर्गदत्त पुढं म्हणतात की, अशा प्रखर बुद्धिमान शिष्यांचा बराचसा वेळ त्यावर बोलण्यात आणि चर्चा करण्यातच जास्त जातो, त्यामुळं मूळ सांगितलेलं काम करायचं राहून जातं. होणाऱ्या नुकसानीलाही अर्थातच असली बुद्धीच कारणीभूत असते.

असल्या बुद्धिमत्तेमुळं प्रगतीत मागं पडणारे, वेळी प्रगती खुंटलेले शिष्य काही कमी नाहीत. अशा शिष्यांकडून गुरूंच्या सांगण्याबद्दल, उपदेशाबद्दल, आज्ञांबद्दल अनेक शंका, प्रश्न उपस्थित केले जातात. त्याची उदाहरणंही आपल्याला माहीत असतील. आजही असंख्य ठिकाणी ती घडताना अनुभवायला येतील.

एवढे नामावतार असलेल्या श्री गोंदवलेकर महाराजांनी आत्यंतिक तळमळीनं, कल्याणासाठी नाम घेण्याचा आग्रह धरला. तरीही त्यांना, नाम घेण्यानं काय होणार, नुसतं नाम घेतल्यानं काम होतं की त्या बरोबर आणखी

काही करायला हवं, नामाचे नक्की परिणाम काय होतात, नाम हे घेऊ की ते घेऊ, नामस्मरण आणि नामोच्चार यांत काय फरक आहे, ते वेगळं असल्यास अधिक चांगलं कुठलं - हे आणि यांसारखे असंख्य प्रश्न असल्या अधिक बुद्धिमत्तेच्या माणसांनी विचारलेले दिसतील.

श्री महाराजांना अनेकदा खेडूत माणसं भेटलेली आहेत. त्यांनी त्यांना राम-राम म्हण, तुझं काम करताकरता देवाचं स्मरण ठेव, एवढं सांगितल्यावर, त्यांनी सांगितलं आहे ना, मग ते पुरेसं आहे, असं त्यांना वाटतं. ते लक्षात ठेवून प्रत्यक्ष त्या प्रमाणं करायला लागलेले लौकिकदृष्ट्या कमी बुद्धीचे लोकही त्यांना भेटलेले आहेत. केवळ या सांगण्यावर अढळ श्रद्धा ठेवून आपली देवप्राप्तीची वाटचाल सहज चालून गेलेले लोकही खूप आहेत. त्यांना त्या अर्थानं असल्या प्रखर बुद्धीची गरज लागली नाही आणि बुद्धी कमी असली तरी ती त्यांच्या कधी आडही आली नाही.

आपल्याला असे शिष्य आढळतात की, अमुक एक गोष्ट - मग ते नाम घेणं असो, दर्शन असो, प्रदक्षिणा असो, शांत राहाणं असो - तुम्ही का करता आहात असं, या तथाकथित प्रखर बुद्धिमान शिष्यांनी विचारल्यावर - महाराजांनी जे सांगितलं ते आमच्या कल्याणाचं आहे, म्हणून ते आम्ही करतो. बाकी आम्हाला काही ठाऊक नाही. इतकं साधं, सहज, सरळ उत्तर देऊन, हा प्रखर बुद्धिमत्तेचा अडथळा ते चटकन निकालात काढतात. शांतपणे आपली वाटचाल-आज्ञापालन सुरू ठेवतात. परिणाम म्हणून हळूहळू आध्यात्मिक प्रगती साधून मुक्तही होऊन जातात. तेव्हा साधक म्हणून अज्ञ माणसांची पात्रता अधिक का आणि प्रखर बुद्धिमत्तेच्या शिष्यांची पात्रता कमी का - याचा आपल्याला उलगडा होतो.

याच बुद्धिमत्तेचा एक दुसरा अडथळा म्हणजे तिच्या दृष्टीनं साधना म्हणजे 'बरंच काही करण्याच्या'कल्पना असतात.वास्तविक निसर्गदत्त म्हणत,

तुम्ही गुरूशी जर भावानं थेट जोडलेले असाल, तर साधनेत श्रमही नसतात आणि बुद्धीलाही काम नसतं. कारण मूळ काम बुद्धीच्या आटोक्याबाहेरचं असतं. पण ते कळायला ही बुद्धी बाजूला ठेवून, फक्त सांगितलेलं करावं लागतं. त्यातही अनेकदा काही करण्यापेक्षा आपण 'काही करायचं नाही' हेच करायचं असतं. आपली तळमळ आणि त्यांची कृपा हे जोडलं गेल्यानं वाटचाल उलट सहज होत असते. पण बुद्धीला हे सारं पटत नाही.

अशाही बाबतीत निसर्गदत्तांना बुद्धिनिष्ठ प्रश्न विचारला गेला की, गुरूंनी शास्त्राविरुद्ध आज्ञा केली तर ? त्यावर निसर्गदत्तांनी साधं उत्तर दिलं की, तरीही आज्ञापालन कराच. ते पुढं म्हणाले, एका संन्याशाला त्यांच्या गुरूंनी, तू लग्न कर म्हणून सांगितलं. त्यांनी ते निमूटपणानं केलं आणि जगावेगळं म्हणून समाजानं त्यांचा अनन्वित छळ केला. तो त्यांनी सहन केला. पण परिणाम काय झाला, तर आपल्यालाच नव्हे, तर सगळ्या जगाला मार्गदर्शक आणि वंद्य अशा - निवृत्तिनाथ-ज्ञानदेव-सोपान-मुक्ताबाई - या चार द्रष्ट्या संतश्रेष्ठ बालकांना त्या संन्याशांनी जन्म दिला ! अशा जगावेगळ्या, तत्कालीन शास्त्राविरुद्ध आज्ञापालनानंसुद्धा शिष्यांचाही उद्धार झाला आणि जगाचाही !

हे इथं लक्षात घेणं जरूर आहे, की साक्षात गुरुपदी पोचलेले शिष्य काही बुद्धिमान नव्हते असं नाही, पण त्यात्या वेळी पूर्वी गुरूंचं ऐकताना त्यांनी असली नुकसानकारक बुद्धी पूर्ण बाजूला ठेवली होती. म्हणून तळमळ, आत्यंतिक श्रद्धा आणि आज्ञापालन यानं ते अलगद आणि लवकर आपल्या मुक्तीच्या, स्वरूपज्ञानाच्या ध्येयाकडं पोचू शकले.

म्हणून आपण बुद्धिमान असायला हरकत नाही. प्रखर नसावं आणि साधनकालात तरी या बुद्धीच्या अडथळ्याबद्दल सावधान असावं !

*

६.

सिद्धांची जी लक्षणे असतात, ती साधकाची साधने असतात.

- श्री मामासाहेब दांडेकर

इथं साधक म्हणजे ज्याला आपली अवस्था काय आहे, याविषयी जाग आलेली आहे, ती कशी असायला हवी याची कल्पना आलेली आहे, त्यासाठी कोणते प्रयत्न करायला लागतील याची जिज्ञासा आहे, ते करण्याची तयारी आहे - अशी व्यक्ती होय.

ही अवस्था साधक शब्दावरून केवळ पारमार्थिक क्षेत्राला लागू आहे, त्यामुळं त्याचा आपला काही संबंध नाही, असं सामान्य व्यावहारिक माणसांना सकृतदर्शनी वाटण्याची शक्यता आहे. त्यामुळं प्रथमच हे लक्षात घेऊ की, त्या अर्थानं साधक याचा अर्थ त्याच्यात्याच्या ध्येयप्राप्तीसाठी धडपडणारी व्यक्ती होय. सामान्य मनुष्यसुद्धा उत्तम शिक्षण, उत्तम व्यवसाय, उत्तम नोकरी, उत्तम कौटुंबिक स्थिती - अशा अनेक गोष्टींच्या विषयी जागा झालेला असतो. त्याच्या दृष्टीनं ती ध्येयं असतात. ती त्याला साध्य करायची असतात. म्हणजेच तो त्या ध्येयांचा 'साधक'च असतो.

ही ध्येय साध्य करायची झाली, ती तशी वैयक्तिक किंवा ऐहिक स्वरूपाची, समृद्धीची असली तरी, ती साध्य करण्याच्या मार्गावरसुद्धा अशा संतवचनातून प्रकाश पडतो. वर उल्लेखलेल्या गोष्टी नुसत्या मिळवायच्या आहेत, या कल्पनांनी-ध्येयांनी त्याचं काम होत नाही. त्यासाठीसुद्धा त्याला

अशी ध्येयं यशस्वीपणे गाठलेली उच्चशिक्षित, उत्तम व्यावसायिक, उच्चपदस्थ, यशस्वी कौटुंबिक - अशा व्यक्तींच्या जीवनाचा, त्यांनी केलेल्या प्रवासाचा आलेख काय आहे, याचा अभ्यास केल्याशिवाय चालत नाही.

त्यात्या क्षेत्रातली उत्तम स्थिती गाठायला, अनेक चांगल्या चांगल्या गुणांचा, अडथळ्यांवर मात करण्याच्या मार्गांचा परिचय अशा उत्तम स्थितीतल्या व्यक्तींच्या जीवनप्रवासाच्या अभ्यासातून त्याला घडू शकतो. त्या अभ्यासातून आपण आत्ता कुठं आहोत आणि आपल्याला कुठं जायचं आहे त्याची निश्चित स्वरूपाची कल्पना त्याला येते. मग त्याच्यात्याच्या परिस्थितीप्रमाणं त्याला त्या क्षेत्रांतले लागू असलेले गुण आणि कौशल्यं यांचा परिचय होतो. तो लक्षात ठेवून त्यानं आपलं रोजचं जीवन तपासलं, घडवलं तर त्याची पावलं ध्येयप्राप्तीच्या दिशेनं पडत जातात आणि त्याच्या कुवतीप्रमाणं त्यातली उत्तम स्थितीही तो गाठू शकतो. त्या अर्थानं तो उच्चशिक्षित होईल, यशस्वी व्यावसायिक होईल, यशस्वी नोकरदार होईल, उत्तम कुटुंबचालक होईल.

यावरून हेही लक्षात येईल की, काहीतरी व्हायचं आहे, तसं बोललं जातं, त्यावर चर्चा होते, इकडं आयुष्य जात असतं, पण अशी माणसं थोड्या फार फरकानं अशा वेगवेगळ्या क्षेत्रांत होती तिथं दिसतात, त्याचं कारण या वचनाचा परिचय नसणं, त्याप्रमाणं काम केलेलं नसणं - हे आहे.ज्यांना उत्तमाची लौकिकातसुद्धा काही ओढ किंवा आवड नाही, त्यांचा विचार इथं करण्याचं कारणच नाही. पण ज्यांना ही ओढ आहे, ती असणं हेही चांगलं आहे, किंबहुना आवश्यक आहे, त्यांनी मात्र लौकिक उत्तम स्थितीसाठीसुद्धा या वचनात दर्शवलेल्या मार्गाचा विचार करावा.

उदाहरणार्थ, उत्तमात उत्तम व्यावसायिक व्हावं - मग ते क्षेत्र कुठलंही असो-त्यासाठी निश्चित स्वरूपाचं ध्येय आपल्या कुवतीप्रमाणं ठरवणं,

वाटचाल करणाऱ्या लोकांच्या संपर्कात राहाणं, हे करावं लागतं. त्यांचं नम्रतेनं-उत्सुकतेनं-प्रांजळपणे मार्गदर्शन घ्यावं लागतं. आपल्या परिस्थितीत त्यात्या व्यक्तींना उपयोगी पडलेल्या गुणांचा प्रयोग करावा लागतो. यांत अनेकदा व्यवसाय क्षेत्राचा अभ्यास, त्यातली आधुनिक साधनं, ग्राहकांशी संपर्क येत असल्यास त्यांच्या गरजा-मानसिकता-अपेक्षा या बाबतीत अभ्यासू असावं लागतं. त्यांची दखल घेऊन त्यानुसार आपापल्या व्यवसायाची ठेवण, कार्यपद्धती बदलणं, अविश्रांत कष्ट घेणं - हे करावं लागतं.ते घेत असतानाच स्वतःच्या यशस्वी वाटचालीकडं लक्ष ठेवून, पण बाकीच्या सर्व संबंधित घटकांच्या अपेक्षा जास्तीत जास्त पूर्ण करीत राहाणं, किमान त्यांच्या संवादात राहाणं - अशा अनेक गुणांचा परिचय आणि अभ्यास करीत राहावा लागतो. हे करणाऱ्या व्यक्ती ही उत्तम स्थिती अवश्य गाठतात.

व्यवहारातली उत्तम स्थिती गाठू इच्छिणाऱ्याला हे वचन जितकं उपयोगी आहे, तितकंच ते परमार्थातली उत्तम स्थिती गाठू इच्छिणाऱ्यालाही उपयुक्त आहे, नव्हे अधिकच लागू आहे. जीवनात उत्तम स्थिती गाठू इच्छिणारा, आपण आधी म्हटला तसा, एक प्रकारचा साधकच असतो. फरक एवढाच आहे, की त्याचा साध्यविषय किंवा ध्येय हे लौकिक असल्यानं ते बदलतं, त्याला मर्यादा असतात. ते गाठूनही पुढं काहीतरी करायचं शिल्लक राहातं. तसंच ते गाठल्यावर माणसाचं पूर्ण समाधानही होत नाही. शिवाय लौकिक यशामुळं निर्माण होणारे संचय, लोभ, स्पर्धा, अस्वस्थता - असे दोषही नकळत उत्पन्न होत असतात. सावध नसलं तर, मन त्याचं समर्थन करून आपल्याला शेवटी असमाधानात नेऊन ठेवतं.

परमार्थातल्या साधकांत फरक असतो, तो इथंच की, त्याचं ध्येय अशा उत्तम व्यक्तींकडं म्हणजे, इथं म्हटल्याप्रमाणं सिद्धांकडं - त्यांच्या लक्षणांकडं-त्यांच्या गुणांकडं बघून घडत जातं, इथंपर्यंत साम्य आहे. पण

तीती लक्षणं गाठल्यावर मिळणारी सिद्धांची स्थिती मात्र, पुन्हा असमाधान किंवा दोष शिरू देत नाही. ती स्थिती गाठल्यावर मिळणारं समाधान हे, एका अर्थानं मन नाहीसं झाल्यामुळं किंवा ईश्वरमय झाल्यामुळं, शाश्वत राहातं. त्यात पुन्हा काही मिळवायचं राहात नाही, फक्त त्या आनंदात जेवढा काळ, जसं जगणं भगवंताला अपेक्षित आहे, तसं, तेवढा काळ जगणं एवढंच काम उरतं. या अर्थानं असं साधक होण्यात मनुष्य जन्माची अधिक सार्थकता आहे, हे वेगळं सांगायला नकोच.

पूज्य मामा महाराज म्हणतात, तसं सिद्धांची लक्षणं-गुण ही साधकाच्या प्रगतीच्या दृष्टीनं सतत अभ्यासाचा विषय असतात. नेहमीच्या प्रापंचिक मनाच्या ठेवणीत हे गुण सहजपणे नसतात, त्याची जाणीव नसली, तर मग मनुष्य आयुष्यभर असमाधानाचे हेलकावे खात राहातो. म्हणून सिद्धांच्या वागण्यातून, चरित्रातून, उपदेशातून त्यांची अशी अनेक लक्षणं-गुण शोधीत राहावं लागतं. सामान्य प्रापंचिकाला अनेकदा त्यात, ते व्यवहाराहून वेगळं वाटलं तरी, ते सिद्धांच्या आचरणाचं पालन असतं आणि त्यामुळं साधकाला सिद्ध बनवायला उपयोगी पडतं.

सिद्धांची लक्षणं असा शब्द पू. मामासाहेब वापरतात, त्यावेळेला त्यातला बारकावाही जाताजाता लक्षात घ्यावा, असा आहे. अनेकदा चांगले गुण चांगले आहेत, त्यामुळं लोकांचा आदर प्राप्त होतो, गौरव होतो म्हणून ते अमलात आणणं वेगळं आणि त्या गुणांपासून इतर कसलीही अपेक्षा न ठेवता ते केवळ भगवंताचे गुण आहेत, त्याला आवडतात आणि त्यामुळं आपण समाधानात राहातो, असं म्हणून ते गुण अमलात आणण्यानं, ते गुण अंगी बाणतात, वेगळे लक्षात ठेवावे लागत नाहीत किंवा त्याप्रमाणं वागण्याचं वेगळं भानही ठेवावं लागत नाही. ते इतके आत्मसात झाले, की ती खऱ्या अर्थानं लक्षणं बनतात. सूर्याबरोबर प्रकाशकिरण सहज यावेत, आकाशाकडे

बघितल्यावर विशालता सहज दिसावी, पाणी प्याल्यावर तहान भागावी - ते जसे गुण अशा सूर्याच्या, आकाशाच्या, पाण्याच्या अंगी असतात,तितकी सिद्धांची लक्षणं - गुण त्यांच्या अंगी बाणलेले असतात. गुणांचा अभ्यास करून ते सहज प्रवृत्तीत परिवर्तित होणं,म्हणजे ते त्याचं लक्षण बनतं.

याची असंख्य उदाहरणं आपल्याला सिद्ध-संतांच्या चरित्रांत आढळतील. गुरुवर्य जोग महाराज यांनी आयुष्य निःस्पृहपणे पांडुरंगाच्या सेवेत घालवलं. त्यांचा अभ्यास, पाठांतर, अव्याहत ग्रंथरचना, अव्याहत कथाकीर्तन, बुवाबाजीचा तिटकारा, राहाणीतला साधेपणा अशी अनेक सिद्धलक्षणं त्यांच्या ठायी कोणत्याही सावध माणसाला सहज दिसून येण्यासारखी होती, शिकण्यासारखी होती. त्यांच्या सत्काराचे, कार्याच्या गौरवाचे जे असंख्य प्रसंग आले, ते त्यांनी किती निःस्पृहपणे आणि कौशल्याने टाळले ते चरित्रातून अवश्य शिकावं, अभ्यासावं. ज्ञानेश्वर माउलींनी सिद्धलक्षणांचं वर्णन करताना 'पूज्यता डोळा न देखावी' हे लक्षण सांगितलं आहे. जोग महाराजांसारखे सिद्धपुरुष ही त्याची उदाहरणंच होत. पण त्यातही त्याच्यातून बारकाईनं शिकण्याची एक दोन लक्षणं पाहिली की, पू. मामासाहेबांसारखी उच्चकोटीची साधक मंडळी सिद्धावस्थेला अशा अभ्यासानं कशी गेली असतील ते कळतं.

अशा गुणांतला एक महत्त्वाचा गुण म्हणजे अमानित्व - अर्थात मानाची अपेक्षा तर नसणंच, पण तो कुठून येऊ नये याचीही काळजी घेणं. त्यासाठी काही कार्यं गुप्त ठेवणं. उदाहरणार्थ, एकनिष्ठ साधनेमुळं जोग महाराजांना स्वतःच्या निर्याणाची पूर्वकल्पना आली होती. इतकंच नव्हे, तर ते कोणत्या दिवशी येणार त्याची कल्पना असूनही त्यांनी ती कोणाला दिली नाही. जाताना कसं जावं, कुठं जावं हेही त्यांचं ठरलेलं होतं. त्यानुसार ही वेळ यायच्या आधीच्या रात्री त्यांनी मामांना गाडी काढायला सांगून

आळंदीला प्रयाण केलं. त्यांच्यावर बाह्यदृष्ट्या खाणंपिणं, इतर व्यवहार यांच्यात कुठं फरक दिसत नव्हता, त्यांनी तो होऊही दिला नाही. त्यामुळं या आळंदीला जाण्याचं गांभीर्य इतक्या जवळच्या मंडळींच्यासुद्धा लक्षात आलं नाही. गाडीनं इंद्रायणी पार केल्यावर त्याची खात्री त्यांनी करून घेतली. मग ते म्हणाले, की आता माउलींच्या पायाशी देह ठेवायला हरकत नाही.

याची चाहूल मामांना लागली, पण या बाहेरच्या वागण्यामुळं, प्रकृतीमुळं खात्री वाटली नाही. जवळीक असल्यामुळं त्यांनी उलटं थोड्या थट्टेनच त्यांना म्हटलं, तुमची प्रकृती चांगली आहे, आहार तर आमच्यापेक्षा चांगला आहे. तेव्हा ते इतकी वर्षं सहवासात असूनही मामांना आयुष्यात माहीत नसलेली गोष्ट बोलले की, त्यांना आळंदीला माउलींच्या जवळ धरणं धरल्यावर फार पूर्वी माउलींचं साक्षात दर्शन झालं होतं. ते जी आयुष्यभर कथाकीर्तनं करीत होते,तो आदेश त्यांना त्या दृष्टांतात माउलींनी दिला होता. त्याची मुदतही सांगितली होती. आता या गोष्टीचं प्रसिद्धीसाठी काय किंवा मानासाठी काय केवढंही भांडवल एखाद्याकडून घडलं असतं, पण अमानित्वाचं लक्षण अंगभूत झालेल्या महाराजांनी याचा या क्षणापर्यंत कधी उल्लेखही केला नाही. फक्त ते इतकं जवळ आल्यानंतर त्यांनी मामांना कल्पना दिली की, माउलींनी दिलेली मुदत आता संपत आली, म्हणून मी असं म्हणतो.

त्याच वर्षी भाद्रपद वद्य प्रतिपदेला,अखंड ज्ञानेश्वरी सांगण्याचं रोजचं व्रत आयुष्यभर पाळलेलं असताना, त्यांनी मामांना ज्ञानेश्वरी सांगायला सांगितली. त्याचं आश्चर्य वाटून आणि काही संदर्भ माहीत नसल्यामुळं मामांनी सहज कारण विचारलं. तेव्हा तो दिवस त्यांची जन्मतिथी होती, हे पहिल्यांदा मामांना कळलं. ते कळायला त्यांच्या निर्याणाचं वर्ष यावं लागलं, इतपत त्यांनी त्याला कमी महत्त्व दिलं होतं. ज्ञानेश्वरीतलं जन्मदिवसासंबंधीचं सिद्धलक्षण कसं अमलात आणावं, त्याचा हा वस्तुपाठच होता.

याच प्रसंगातली मामांची कर्मनिष्ठा अर्थात सिद्धलक्षणांचा अभ्यासही शिकण्यासारखा आहे. मामा उच्चशिक्षित शिवाय संबंध मोठमोठे राजकारणी, मंत्री, अधिकारी, संत, सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश, कुलगुरू इथंपासून ते बरोबरीचे टाळकरी, पखवाजी इथंपर्यंत सर्वत्र होते. असंख्य मोठमोठ्या मंडळींचा त्यांच्याशी पत्रव्यवहार होत असे. त्यात त्यांच्या गुणांचा, त्यांनी केलेल्या उपकारांचा, त्यांच्या थोरवीचा असंख्य वेळा उल्लेख असे. त्यात जेवढा उत्तर देण्याचा भाग असेल तेवढं करून, तो मान ते अंगाला लावून घेत नसत. ते इतकं की, ज्यात मानाचा उल्लेख असेल अशी थोरथोरांची असंख्य पत्रं मामांनी स्वतःच्या हातांनी वर्षानुवर्षं फाडून टाकलेली आहेत. इतक्या मोठ्या पदस्थांनी केलेली स्तुती लोकांना कळू नये, हा हेतू इतक्या कटाक्षानं सांभाळणं हे सिद्धलक्षणाचं किती कटाक्षानं केलेलं साधन आहे, हे शांतपणे, बारकाईनं विचार केला तरच लक्षात येऊ शकेल.

अशातला एक भाग म्हणजे त्यांनी स्वतः जोग महाराजांचं जे चरित्र लिहिलं तो. त्यांचा जोग महाराजांचा एका दशकाचा अत्यंत निकटचा संबंध होता. त्यात सांगण्यासारखे असंख्य मौलिक प्रसंग होते. व्यवहारानं ते उल्लेख रास्त होते, लिहिणं शोभूनही दिसलं असतं. पण चरित्र लिहिताना त्यात अशा कारणानंसुद्धा नकळत मोठेपणा आपल्याकडं येऊ नये, म्हणून स्वतःचे उल्लेख टाळून मूळ प्रसंगांचा समावेश चरित्र लिहिताना बारकाईनं आणि तटस्थतेनं केला आहे. त्यावरून काय ते शिकावं.

गुरूंचं चरित्रलेखन करताना अनेकांनी ते प्रसिद्ध करण्यासाठी आर्थिक मदत दिली होती. किंबहुना त्यावरच ते प्रसिद्ध होणं शक्य होतं. दोघांच्याही थोरवीमुळं त्यासाठी देणग्यांचाही ओघ येत होता. पण त्याला लागणाऱ्या खर्चाच्या व्यतिरिक्त एकही पैसा यात येऊ नये,याची त्यांनी काळजी घेतली. शिक्षणसंस्थेच्या शाळेचं बांधकाम चालू असताना एक उद्योगपती त्या काळात

त्यांच्याकडं इतरांप्रमाणं देणगी देण्यासाठी पंचवीस हजार रुपये घेऊन आले. ते मामांनी साभार परत केले. कारण कोणतं होतं, तर दरम्यान शाळेचं बांधकाम पुरं झालं होतं. ते सांगून मामा म्हणाले, पुन्हा नवीन काम निघालं तर मी तुम्हाला अवश्य सांगेन, पण हे पैसे मात्र मला आत्ता नकोत. हा सिद्धलक्षणांचा अभ्यासच या महात्म्यांना सिद्ध बनवू शकला.

निर्लोभता हा सिद्धलक्षणातला महत्त्वाचाच गुण. तो स्वतः मामांच्या गुरूंच्या ठिकाणी किती अंगभूत होता, ते पाहायला हरकत नाही. स्वतः जोग महाराज असताना त्यांनाही मानणारी आणि त्यांच्या कार्याला कुठल्या ना कुठल्या प्रकारे मदत व्हावी, अशी इच्छा असणारी अनेक शिष्य मंडळी होती. त्यातल्याच एकांनी त्या काळातले एक लाख रुपये अशा कार्यासाठी जोग महाराजांच्या समोर आणून ठेवले. त्यावेळी काही विनियोग समोर नसल्यामुळं आणि अर्थातच वृत्ती निर्लोभ असल्यामुळं महाराज म्हणाले, 'किं करिष्यामः' - अर्थात हे घेऊन मी काय करू, असं म्हणून त्यांनी ते लाख रुपये त्या शिष्याला परत केले.

साधकाला सिद्धांच्या लक्षणांवरून हे कळतं की, देवाचे उपकार हे सर्वांत थोर आणि त्यासाठी गुरूंनी दिलेलं साधन - नाम हे थोर. त्याचं स्थान पहिलं. श्री अंबुराव महाराजांच्यामुळं पंगत खोळंबली म्हणून ते नेम सोडून उठून बाहेर आले. पंगतीला बसले, पंगत सुरू झाली. त्या क्षणी नेम करण्यापूर्वी आपण जेवतो आहोत याची खंत वाटून, डोळ्यांत पाणी येऊन महाराज पंगतीतून उठले आणि नामस्मरणाला खोलीत निघून गेले. जाताना म्हणाले, आधी चाकरी मग भाकरी.

अशी अनेक सिद्धलक्षणं सतत समजून घ्यावी आणि तेच आपलं साधन समजून जर उपासना केली तर सिद्धावस्था-देव दूर नाही !

*

७.

अनुकूलतेच्या आणि उताराच्या जागा शोधून नदी ओलांडावी...!

- श्री ज्ञानेश्वर माउली

इथं अनेक प्रापंचिक साधकांना असणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन आपली चांगली ध्येयं साध्य करण्यासाठी श्री माउलींनी कौशल्याचे आणि सात्त्विक चातुर्याचे अनेक मार्ग दिले आहेत. आपल्या परिस्थितीला ते अर्थातच नेहमी लागू होणारे असल्यामुळं त्यांचा विचार करूया.

अनेकांची ही अडचण असते, की त्यांना प्रपंचाचं स्वरूप लक्षात येतं. त्यातले स्वार्थाचे व्यवहार, वरवरचं प्रेम, सततची अस्वस्थता, पदोपदी काळजी लावणारे प्रसंग, वेळी खोटी पडणारी नातीगोती - अशा अनेक गोष्टींचा त्यांना अनुभव येतो. काहींच्या हे सगळं लक्षात येतंच असं नाही, पण यापलीकडं काही चांगलं, टिकाऊ, आनंदी जीवन आहे, याची जाणीव कुठंतरी होत असते. त्याबद्दलची जिज्ञासा असते, पण ती पुरी करण्यासाठी प्रपंचाच्या गराड्यातून बाहेर कसं पडावं, हे त्यांना कळत नाही.

काहींची स्थिती याहीपेक्षा वेगळी असते. प्रपंचातल्या त्यात्या वेळच्या प्रसंगांची, माणसांची, वस्तूंची, पदप्रतिष्ठांची त्यांना मनापासून ओढ वाटते. तसं तर यातलं काही ना काही रोज समोर येतंच. त्याच बरोबर त्यासाठी लागणारे कष्ट, धडपड हेही येतं. जसं एखादं कार्य निघावं, कार्यक्रम असावा आणि त्यात आपण गुंतून जावं, त्याचा म्हणून जो एक आनंद असतो, तो

मिळावा - तसं त्यांचं अनेकदा घडतं. अशा वेगवेगळ्या सुखदुःखाच्या प्रसंगांत ते सहजपणे सहभागी होतात, अनेकदा स्वभावामुळं ओढले जातात. एखादं लग्नकार्य जसं ठरलं की, मनाला अनेक प्रकारची कामं - आवडीच्या खरेद्या, भेटीगाठी, आमंत्रणं, समारंभ, खाणंपिणं - अशा अनेक गोष्टींनी सहज गुंतून जायला होतं. तो कार्यक्रम संपेपर्यंत मनाला इकडंतिकडं विचार करायलाही सवड मिळत नाही. पण तो कार्यक्रम संपला आणि समोर दुसरं काही नसलं, की, नोकरीवाला एक वेळ रजा संपली म्हणून नोकरीला निघून जातो, पण घरी राहाणारे उरलेले एकदम रिकामे होऊन जातात. आत्तापर्यंत त्यांची वधुवरांना किंवा त्यांच्या आईवडिलांना असलेली गरज एकदम संपून जाते. मग मात्र एक एकाकीपण अशा आजूबाजूच्यांना नकळत येतं. ते स्वाभाविक असतं, त्यात कुणाची काही चूकही नसते.

तीच गोष्ट एखादं प्रोजेक्ट संपल्यावर त्यावरच्या कामगारांची होते. एखादं बांधकाम संपल्यावर गवंडी-सुपरवायझर-बिल्डर यांची होते. इव्हेंट संपला की, अलीकडच्या इव्हेंट मॅनेज करणाऱ्या कंपनीच्या मालकांपासून - कामगारापर्यंत सर्वांची होते. त्यात्या वेळी जे सावध असतात, त्यांच्या असं लक्षात येतं, की आत्तापर्यंत आपण जे एका आनंदात होतो, तो तर आता नाहीच, पण आता पुढं असं काही घडेपर्यंत आपण काय करायचं हाही प्रश्न भेडसावीत राहातो. यातही म्हटलं तरी इतरांची काही चूक नसते. आपल्याला काम मिळावं आणि त्यामुळं आपण आनंदात राहावं म्हणून काही कुणी सारखी लग्न करीत राहाणार नाही, बिल्डिंग बांधत राहाणार नाही की इव्हेंट साजरे करीत राहाणार नाही. त्यावेळी विचार करणाऱ्यांच्या हे लक्षात येतं, निदान ही शंका तरी येते, यावी की, आपल्याला काम असताना असलेला आनंद खरा की आत्ता रिकामं असताना - खरंतर काही ताण नसताना आलेली पोकळी - दुःख खरं ?

अशा निमित्तानं जरी विचार करीत पुढं गेलं, तर या मंडळींच्याही लक्षात येईल, की या दोन्ही परिस्थितीत असणारा आनंद किंवा दुःख दोन्हीही खरी नाहीत, तर मन गुंतून राहिल्यानं किंवा रिकामं राहिल्यानं होणारे ते आनंदाचे किंवा दुःखाचे आभास आहेत. आता हे प्रसंग तर येत जात राहतील. जिथं संबंध असेल तिथं कर्तव्य म्हणून मदत करणं राहील-काम करणं राहील, जिथं व्यवसाय असेल तिथं त्यात्या वेळेपुरतं व्यावसायिक काम राहील त्याचं मूल्य राहील, पण त्यातून मिळणारा आनंद किंवा नंतर येणारं रिकामपण हे केवळ मनाचे आभास आहेत, खेळ आहेत. ते म्हणजे शाश्वत आनंद नव्हे. हे काहीही असताना किंवा नसताना जो आनंद टिकून राहातो, तो कसा असावा आणि कधी मिळेल याची जिज्ञासा लागणं हा या प्रकारच्या मंडळींच्या आयुष्याला शाश्वत आनंदाचं, मुक्तीचं दार उघडून देणारा टप्पा ठरतो. या टप्प्यावर जागे होतील, ते भाग्यवान !

अशा आधीच प्रपंचातल्या क्षणभंगूरतेचा अनुभव आलेले लोक असोत किंवा असे प्रसंगानं जिज्ञासा जागृत झालेले लोक असोत, त्यांची जर ही जिज्ञासा प्रामाणिक असेल, तिचा शोध घेण्याचा त्यांचा निर्धार कायम असेल, तर त्यांची खऱ्या आनंदाची वाटचाल सुरू झालीच म्हणून समजावं. प्रपंच त्याच्या पद्धतीनं सुरू राहिला, तरी अंतर्यामी ही आलेली जाग टिकवणं आणि त्या दिशेनं प्रगतीचे प्रयत्न करीत राहाणं, हेच काम आता महत्त्वाचं ठरतं. ते असे प्रसंग सुरू राहिले तरी करीत राहाता येतं.

अशा सर्वांना येणारा महत्त्वाचा प्रश्न हा,या प्रयत्नांतलं सातत्य कसं टिकवावं आणि आपलं शाश्वत आनंदाचं ध्येय कसं गाठावं, हा असतो. निर्धार कायम असला, कष्टांची तयारी असली, तरी प्रपंचातली-व्यवहारातली सततची कामं ही माणसाला या ना त्या मार्गानं गुंतवून ठेवतातच. पैलतीरावर जाण्याचा निर्धार असला, मोठ्या कष्टानं हातपाय मारले तरी अलीकडच्याच

किनाऱ्यावर आपण, बराच काळ झाला तरी, आहोत अशी खंतही काहींना जाणवत असते. पैलतीर गाठणार की नाही की, असेच संसारात वेगवेगळ्या निमित्तांनी गुंतत राहून, गटांगळ्या खाऊन थोडंफार पुढं, पण याच किनाऱ्यावर बुडून आपला शेवट होणार की काय, असं एक सात्त्विक भयही काहींना वाटतं, हे खरं आहे.

अशा वेळी संतांचं अनुभवाचं सांगणं लक्षात घेण्यासारखा उत्तम मार्ग नाही. श्री माउली म्हणतात, ते लक्षात घेणं खचितच उपयोगी पडेल. निर्धार आणि कष्ट हे नातं तसं सरळ व थेट वाटलं तरी प्रत्यक्षात ते तेवढंच नाही. त्यामध्ये वाटेत एक कौशल्याचा टप्पा आहे. निर्धार थेट अमलात आणायला जाणं अनेकदा उगाचच प्रपंचातले गैरसमज, संबंधांतले-कामांतले गोंधळ, नुकसान अशा गोष्टी घडवून आणू शकतं. त्यावेळी या कौशल्याचं महत्त्व कळतं आणि माउलींच्या सांगण्यातलंही.

आपण उदाहरणानं पाहू. समजा वरच्या साऱ्या गोष्टी लक्षात आलेल्या माणसानं ऐलतीरावर जाण्यासाठी गुरूंची मदत घ्यायची ठरवली, वाचन करायचं ठरवलं, नाम घ्यायचं ठरवलं, सत्संगाला जायचं ठरवलं. हे सगळं करणं बरोबरही आहे, जरूरीचंही आहे. त्यासाठी लागणारा निर्धारही सुदैवानं निर्माण झालेला आहे. हे खरं असलं तरी प्रसंग कसे असतात ते पाहू.

समजा, निर्धारानं सकाळी उठून जपाला बसलं आणि अचानकपणे कुणी पाहुणे घरी आले, तर ते आलेले असताना उठून त्यांचं स्वागत,आतिथ्य, चहापाणी करणं, चौकशी करणं हे सोडून त्याच निर्धारानं आपला जप तसाच पुढं तासभर चालू ठेवला तर गोष्ट चांगली असली, निर्धार-कष्ट पुरेसे असले तरी, अशामुळं काय आफत ओढवेल, याची कल्पना आपण करू शकतो. आपल्या येण्याची यांना किंमत नाही, यांना साधा व्यवहार नाही,आम्ही कशासाठी अचानक आलो त्याची साधी चौकशी करण्याचं तारतम्य नाही,

इथंपासून आपल्यावर काय काय कॉमेंट्स् होतील, याची कल्पना केली तरीसुद्धा आपण पटकन माळ बाजूला ठेवून स्वागत करायला उठू. न उठलो तर हे गैरसमज इतरांच्यात तरी पसरवले जातीलच, पण जे चांगलं काम आपण करीत होतो, त्याच्यावरसुद्धा अकारण टीका होईल. अशावेळी माळा ओढणं हा काय परमार्थ आहे का, यापासून अनेक प्रतिक्रिया ऐकायला लागतील, त्यानं काही भलं होण्यापेक्षा नुकसानच जास्त होईल. प्रापंचिक संबंध दुरावतील आपल्यालाही पुढं अडचणी येतील, हे उघड आहे.

याच्यावर विचार केला तर श्री माउलींचा जो सल्ला आहे, तो या मार्गातसुद्धा कौशल्य दाखवण्याचा आहे आणि तो किती मोलाचा आहे, हे कळू शकेल. हीच गोष्ट लग्नं, कार्यप्रस्थं, सभासमारंभ अशा अनेक वेळी याच पद्धतीनं वागल्यास घडण्याची शक्यता आहे. त्यामुळं, शाश्वत आनंदाचा मार्ग चालायचा, परमार्थाचा पैलतीर असल्या प्रापंचिक आणि गटांगळ्या खायला लावणारी नदी ओलांडून गाठायचा - हे जरी खरं असलं, तरी ते करण्यात भाव, हेतू, क्षमता, प्रसंगावधान अशी अनेक कौशल्यं वापरून ते करावं, हा सल्ला अतिशय मोलाचा आहे.

यासाठी माउलींनी सुचवलेला मार्ग थोडा तपशिलानं लक्षात घ्यावा. हेच नदीचं उदाहरण घेऊन माउलींचा उपदेश समजून घेता येईल. मूळ हेतू प्रपंचातल्या अशा अशाश्वत आनंदाच्या ऐलतीरावरून परमार्थाच्या, भगवंताच्या आनंदाच्या पैलतीरावर जाण्याचा आहे, हे लक्षात ठेवावं. नदी तर ओलांडायचीच आहे. पण बाकीच्या प्रपंचातल्या प्रसंगांचा विचार न करता, नुसत्याच निर्धारानं नदी ओलांडणं हे उपयोगापेक्षा उपद्रवाचंच ठरतं. अशा वेळी निर्धार आणि हट्ट यांतला फरक समजून घ्यावा. आपला नदी ओलांडायचा निर्धार, भाव, तळमळ भगवंताला कळते आणि तीही पुरते. आहे तिथं त्याच वेळी नदी ओलांडणं हट्टाचं ठरतं.अनेकदा ते अपयशही देऊ

शकतं, त्याऐवजी माउली म्हणतात, नदीच्या काठानं थोडं सबुरीनं, निर्धार कायम ठेवून पुढं चालत राहावं. आपण जिथं असतो तिथलं नदीचं पात्र अनेकदा मोठं असतं. म्हणजे प्रपंचात त्यावेळेला ती गोष्ट करायला जाणं गैरसोयीचं आणि अवघड असतं. त्यापेक्षा थोडं सबुरीनं, प्रपंच करीतकरीत प्रपंचातला प्रसंग पार पाडीतपाडीत, म्हणजेच काठाकाठानं, थोडं पुढं गेलं, तर प्रसंग मागे पडून प्रपंचाची अनुकूलता मिळते आणि तिकडं नदीचं पात्रही एखाद्या ठिकाणी छोटं असल्याचं लक्षात येतं. तर काही ठिकाणी पाण्याला उतार आहे, ते खोल नाही, गुडघ्याएवढ्या पाण्यातून अशा ठिकाणी मनुष्य सहज नदी ओलांडून जातो. ती ठिकाणं समोर येतात. त्यावेळी कौशल्यानं पटकन पलीकडं जावं. इकडं प्रपंचाचंही नडत नाही आणि तिकडं परमार्थही साधतो.

अगदी उदाहरणानं पाहायचं झालं तर, पहिल्यांदा म्हटल्याप्रमाणं लग्नकार्य उरकेपर्यंत भरपूर मदत करावी, त्या काळात फक्त आपल्याला भगवंताचं स्मरण मनात ठेवून पुढं त्याला वेळ द्यायचा आहे, हा निर्धार आठवणीत ठेवावा. मदत केल्यानं संबंध चांगले राहातात, वेळेला पुढं आपल्यालाही गरजेला मदत मिळते. मात्र ते कार्य पार पडलं की, त्यांनाही आपली त्या अर्थानं गरज नसते, आपणही घरी, गावी जायला मोकळे असतो. अशा वेळी मोकळं होताच सावध राहून, आता नदीला उतार सापडला आहे, आपण एकटे आहोत, घरी आहोत - हे लक्षात घेऊन मधल्या आठ-पंधरा दिवसांचा सगळा परमार्थ भरून काढावा, हे कौशल्याचं आहे. तीच गोष्ट गृहिणीला सगळ्यांच्या कामांची, स्वयंपाकाची, डबे-वेळा गाठण्याची गरज निभेपर्यंत मनापासून करीत राहाण्याची आहे. ती कामं वेळेला पार पडली, सारी शांतता झाली की मग मात्र कौशल्यानं आपलं दिवसाचं नाम उरकून घ्यावं. अशा वेळी आपली इतर कामं काढू नयेत, ही

कौशल्याची दुसरी बाजूही आहे. हीच गोष्ट अनेकदा रडत्या मुलाला शांत करणं, त्याचं दूध-पाणी पाहाणं आणि ते झोपी गेलं की, आपलं पारायण करून घेणं या बाबतीतही खरी आहे.

माउली म्हणतात, की मुळात आपला भाव जर भगवंताशी ऐक्य पावण्याचा असेल, त्यात जर गुरूंची आपल्याला साथ आहे याची खात्री असेल, तर इतक्या या मायाजाळातही ते, या आपल्या ध्येयाला अनुकूल अशा या भवनदीतल्या उताराच्या जागा अधूनमधून आणून देत असतात, याचीही खात्री बाळगावी. त्यावेळी मात्र आपल्या इतर कल्पना, संभ्रम, अहंभाव, विकल्प टाकून देण्याची गरज असते. तर या जागा आपल्या नजरेलाही येतात आणि ओलांडल्यामुळं आपला लाभही होतो.

त्यात माउलींनी मोठ्या बारकाईनं लक्षात आणून दिला आहे तो मुद्दा असा की, काही वेळा माणसाला संसाराचं जे नेहमीचं प्रेम असतं, हौस असते, आवड असते, त्यालाही काही प्रसंगात, काही अनुभवांमुळं-घटनांमुळं ओहोटी लागते. ही ओहोटी कदाचित थोडावेळ टिकते, कदाचित जास्त वेळ. ती कशीही असली तरी ती परमार्थातला भाव येऊन, साधन व्हायला अनुकूल वेळ असते, यात शंका नाही. छोट्याशा वाटेनं रस्ता ओलांडला काय आणि राजरस्त्यानं गेलं काय त्या क्षणी पटकन पलीकडं जाता येतं, ते येतंच. म्हणून अशा 'अनुरागाचा निरु ताउनी' म्हणजेच संसारातल्या प्रेमाच्या ओहोटीची संधी तपासून त्याचाही कौशल्यानं लाभ घ्यावा. त्या काळात अधिक भावानं, आर्ततेनं साधन होत असतं. ते आपल्याला लवकर भगवंताकडं घेऊन जातं. बरं, हे मुद्दाम केलेलं नसल्यामुळं त्यात सहजता असते, इतर नुकसान घडवणारा हट्टही नसतो. यालाच परमार्थातलं कौशल्य म्हणावं.

आपल्याला एकदा शाश्वत आनंदाची गरज पटली, ओळख झाली तो मिळवण्याचा निर्धार झाला की, अशा कौशल्याचे अनेक उपाय आपल्याला

भगवंत समोर आणून देत असतो. साधनेला अनुकूलता लागते, हे खरं. पण त्याहीपेक्षा दैनंदिन प्रपंचातले असे ओहोटीचे, उताराचे, पाणी कमी असलेले नदीतले उतार शोधण्यातलं कौशल्य लागतं, हेही तितकंच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त खरं आहे. कारण त्यामुळं अनुकूलतांची वाट बघण्यात जाणारा आयुष्याचा वेळ वाचून, प्रतिकूलतांतही कौशल्यानं परमार्थ साधता येऊन प्रगती लवकर होते.

व्यवहारात आपण पाहिलं असेल, की एखादा दिवस अचानक नोकरीत सुट्टी मिळते, यायचे पाहुणे रद्द होतात, स्टेशनवर आपण वेळेवर गेलो असलो तरी रेल्वे तीनतीन तास लेट असते, एखादा कार्यक्रम रद्द होतो, एखादं अवघड काम त्यातली काही युक्ती सुचून किंवा कुणी जाणकार भेटून तेच काम सोपं आणि लवकर होण्याचा मार्ग मिळून वेळ वाचतो. या सगळ्या नदीच्या उताराच्या, ओहोटीच्या आणि कमी पाणी असण्याच्याच जागा आहेत. एरवी आपला हा वेळ कर्तव्यापोटी गेला असताच, पण भगवंताच्या योजनेप्रमाणं आपल्या तळमळीला प्रतिसाद म्हणून म्हणा किंवा त्यात्या गोष्टीची वेळ म्हणून म्हणा - तो वेळ वाचण्याच्या संधी अनेकदा येत असतात. त्या ओळखल्या आणि वापरल्या तर परमार्थाला, प्रपंच सांभाळूनही वेळ मिळायची काही अडचणच नाही, हे लक्षात येईल.

'येणे उपाये मज भजले । ते हे माझी माया तरले ।।' हा माउलींचा सल्ला लक्षात ठेवला तर, एरवी दुर्मीळ वाटणाऱ्या संधी आपल्याला अनेक ठिकाणी आहेत हे लक्षात येईल. त्या संधी वापरता येतील. मग ही मायानदी ओलांडणं भक्तांना अवघड नाही. अज्ञानामुळं किंवा कौशल्याच्या अभावामुळं असे उपाय करणारे लोक कमी आढळले, तरी ज्यांना हे कळलं, ते या उपायांनी भक्ती साधू शकतील, वाढवू शकतील यात शंका नाही !

*

८.

राग-प्रतिक्रिया-सूड यांचा आनंद
हा क्षणभर असतो,
पण क्षमेचा आनंद हा चिरकाल असतो..

- श्री मेहेरबाबा

आपल्याला राग-प्रतिक्रिया-सूड घ्यावासा वाटणं या गोष्टी अपरिचित नाहीत. मनाविरुद्ध झालं की, त्या कुणाच्याही मनात येतात. परिस्थितीप्रमाणं तो त्यातली प्रतिक्रिया देतो. तिची तीव्रता असेल त्याप्रमाणं घडणाऱ्या गोष्टी अवलंबून असतात. हे जवळजवळ सर्वांच्या विशेषतः सामान्य माणसापासून अगदी सत्ताधीश देशांच्या पातळीपर्यंत सगळीकडं अनुभवायला येतं.

हे आजच नव्हे, तर हजारो वर्षं वेगवेगळ्या वेळी माणसांना अनुभवायला आलेलं आहे. मग तो राग ऋषींचा असो, रामायण-महाभारतातल्या व्यक्तींचा असो, कुणा कट्टर धर्म पंथीयांचा असो, कुणा खेळाडू-अभिनेत्यांचा असो, कुणा सामान्य गरीब कुटुंबातल्या व्यक्तींचा असो किंवा आजकालच्या दहशतवाद्यांचा असो.

त्याची कारणंही तितकीच पुरातन आहेत, ती आजही तशीच आहेत. मनाच्या ठेवणी, ग्रह, मतं, पंथ, विचारप्रणाली, त्याबद्दलचे आग्रह यांसारख्या-कुठल्याही गोष्टींच्या विरोधात कुणाकडून काही घडलं की, मनाच्या प्रतिक्रिया उमटायला सुरुवात होते. या प्रतिक्रिया देऊन मूळ प्रश्न सुटले आहेत,असाही कुणाचा अनुभव नाही. हजारो वर्षं या प्रतिक्रिया साध्या रागापासून ते

महायुद्धांपर्यंत, अगणित पातळीवरच्या घडूनसुद्धा, त्यातून मूळ प्रश्नही सुटले नाहीत आणि नुकसान मात्र झालं आहे. हा अनुभव तेव्हाही होता, आजही येतो. त्यातल्या त्यात श्री मेहेरबाबा म्हणत की, सूडाची पातळी म्हणजे तर प्रतिक्रियांची अतितीव्र पातळी होय. तिच्यामुळं होणारी नुकसानं ही पुढं शेकडो वर्षं, पिढ्यान्‌पिढ्या भरून न येणारी असतात. काही नुकसानं तर कायमचीच होऊन जातात.

आजकालच्या संदर्भात हा प्रश्न घरोघरी एका वेगळ्याच प्रकारे गंभीर स्वरूप धारण करीत आहे. तो म्हणजे या रागाच्या प्रतिक्रिया फार अधीरपणे आणि चटकन व्यक्त होत आहेत. काहींना त्याची जाणीव होते, पण काय करावं ते कळत नाही. बहुतेकांना त्याची जाणीवही होत नाही. नुकसान मात्र सगळीकडं वाढतं आहे. उदाहरणानं पाहायचं झालं, तर एखाद्या लहान मुलानं खेळण्याचा हट्ट धरला. ते खेळणं त्याला दिलं नाही, तर ते रुसून बसतं. ते मूलही लहान आहे आणि प्रतिक्रियाही फक्त रुसण्याचीच आहे. म्हणून नुकसानही मर्यादित आहे.

पण आज मोठ्या मुलांना मोबाईल नाही म्हटलं, मोटारसायकल नाही म्हटली की, होणाऱ्या प्रतिक्रिया हळूहळू एवढ्या तीव्र बनत चालल्या आहेत की, त्यातून होणारं रागाचं, विध्वंसाचं, घातपाताचं नुकसान एवढं मोठं आहे की, त्याची कल्पनाही करणं कठीण आहे. बरं अशा गोष्टी, वस्तू घेऊन फार मोठं काही साधणार आहे, कुणाची प्रगती होणार आहे असंही नसतं. काही गोष्टी आत्ता शक्य नसतात, गरजेच्याही नसतात.तर काही वस्तू काही काळानं घेतल्या तरी चालण्यासारख्या असतात. उलट त्या नंतर घेणंच अधिक हिताचं असतं.पण मनात आलं की, ते झालं पाहिजे ही प्रवृत्ती आता इतकी बळावत चालली आहे, की त्यामुळं अधीरता आणखी आणखीच वाढत जाते आहे आणि त्यामुळं अनेक दुर्दैवी घटनाही घडत आहेत.

त्यामुळं आता प्रतिक्रिया, रिॲक्ट होणं, राग भडकणं, डोक्यात सूडाच्या भावना निर्माण होणं - हे सगळे प्रश्न विध्वंस करीत असल्यामुळं ऐरणीवर आले आहेत. अशा वेळी अशा संतवचनांचं अध्ययन करण्याची गरज अधिकच वाढली आहे. काही संस्कारांनी मनाची ठेवण बनते. जगात अशा असंख्य प्रकारच्या मनाच्या ठेवणी आहेत. स्वार्थ, अहंकार, भय, असुरक्षितता अशा प्रेरणा असतात. अशा ठेवणी तर प्रत्येकाच्या ठिकाणी असतात. त्या सारख्या असणंही शक्य नसतं. एका घरात वाढलेल्या दोन मुलांतही ठेवणी समान असणं शक्य होत नाही. मग वेगळ्या प्रकारच्या मनाच्या ठेवणींना सामोरं जाणं अपरिहार्य ठरतं. त्यातून पुन्हा प्रत्येकाला आपापली ठेवण ही चांगली आणि आदर्श वाटते. वास्तविक तेही खरं नसतं.

हे सगळं लक्षात घेतलं, तर अशा ठेवणीतून येणाऱ्या प्रतिक्रिया या वेगळ्या असणार अनेकदा विरोधी असणार, हे खरंतर गृहीत धरण्याची आणि समजून घेण्याची गोष्ट आहे. अंतिमतः बरोबर काय आहे, हे कदाचित आपण चर्चेनं किंवा शांत वृत्तीनं, काही काळानं नीट समजू शकू. ही वस्तुस्थिती आहे. ती लक्षात घेतली, तर मग अशा तऱ्हेच्या नकारात्मक प्रतिक्रियांना किंवा रागाला आपोआपच स्थान कमी राहील. प्रतिक्रिया कमी येतील. दुर्घटना टळू शकतील.

हे सारं अमलात येण्यासाठी जी समजूत, जी थोडाकाळ शांत राहाण्याची वृत्ती लागते, ती म्हणजेच इथं श्री मेहेरबाबांना अपेक्षित असलेली क्षमा होय. एका अर्थानं ती क्षमेची सुरुवात आहे. एकदा समजूत आणि शांती आली की, मग दुसऱ्याची प्रतिक्रिया कळू शकते. त्याच्या चुकीच्या कृती सोडून दिल्या जाऊ शकतात. त्या मनात राहात नाहीत.त्यावर कुठली पुढची प्रतिक्रिया उमटत नाही. तेव्हा क्षमा पूर्ण होते.

समजा, स्वतःपुरतं अशा प्रतिक्रियांनी होणारं नुकसान जरी लक्षात

आलं, पुढं होणारं सार्वत्रिक नुकसान लक्षात आलं त्यासाठी लागणारी समजूत, शांती, क्षमा यांचा अभ्यास आणि अंमल घडला, तरी त्याचा परिणाम म्हणून आपोआपच इतरांच्या ठिकाणीसुद्धा निर्माण होणाऱ्या प्रतिक्रियांची तीव्रता कमी होऊ लागते. विघातक कृतीसुद्धा टळत जातात. त्यातून कौटुंबिक - सामाजिक समजूत, क्षमा व शांती यांची वाढ होते. यासाठी मोठ्या बदलाची वाट न पाहाता, त्याची सुरुवात आपल्यापासून केली, तरी त्यानं हा मोठा सामाजिक प्रश्न सोडवायला सुरुवात व मदत होत असते, हे लक्षात घ्यावं.

अनेकांना तापटपणाच्या रिॲक्शन, राग, सूड या गोष्टी शौर्याच्या वाटतात. पण त्याचे आजपर्यंतचे परिणाम तपासून पाहावेत. कुठल्याही सूडाच्या कृतीनं शांती निर्माण झालेली नाही. उलट, एक बाजू सूड उगवण्यात आज यशस्वी झालेली दिसली, तर दुसरी बाजू यथावकाश प्रतिसूड, प्रतिहल्ला करण्याला प्रवृत्त झालेली दिसेल आणि नंतर यशस्वीही झालेली दिसेल. यातून एक न थांबणारं दुष्टचक्रच सुरू होत असतं.

कुटुंबातले संबंध दुरावणं, घटस्फोटासारख्या घटना घडणं, भावंडं किंवा घरातले नातेवाईक न्यायालयात हेलपाटे घालीत असणं, मालक-कामगार यांतल्या संघर्षांनी अक्षरशः जिवावरचे धोके निर्माण होणं,न्यायालयीन प्रक्रिया सुरू होऊन, त्यात पोटापाण्याचा रोजगार देणारा मूळ उद्योगच बंद पडून, असंख्य कुटुंबं रस्त्यावर येणं, अन्नपाण्यासारख्या साध्या सुविधांपेक्षा अत्यंत महागड्या शस्त्रसामग्रींवर असंख्य देशांचा अमाप खर्च होणं - हे सारे या मूळ प्रतिक्रिया-राग-सूड यांचेच वेगवेगळ्या पातळ्यांवरचे आविष्कार आहेत, हे लक्षात आलं, तर आपल्याला बाबांच्या या समजूत-शांती-क्षमा या मार्गांचं महत्त्व पटेल आणि आपल्यापुरते तरी निदान ते अमलात आणण्याची गरज वाटेल. त्यातून व्यक्तिगत आणि व्यापक हितासाठी संतवचनांचा मार्ग किती मोलाचा आहे, हे अधोरेखित होईल.

*

९.

जहाजे काही काळ गोदीत आणून ठेवावीत...

- स्वामी रामतीर्थ

आपल्याला संसाराला पर्याय नाही, तसंच संसारात अखंड कर्म करीत राहाण्यालाही पर्याय नाही. तटस्थतेनं पाहिलं तर शरीर काय किंवा त्याबरोबर काम करणारं सूक्ष्म मन काय, सगळं रोज रात्रंदिवस आणि वर्षानुवर्षं एखाद्या यंत्रासारखं वापरलं जात असतं. त्यातही पुन्हा यंत्र ज्याप्रकारचं काम करतं, ज्यासाठी ते बनवलेलं असतं, तेवढंच काम ते करीत असतं. उदाहरणार्थ एखादा यंत्राचा तुकडा बनवणारं, गिरणीतल्या चाकासारखं सतत फिरत राहाणारं - अशी यंत्रं बाराबारा चौदाचौदा तास अशी राबतात, पण कामाचं स्वरूप तरी एकच असतं.

शरीराची आणि मनाची अवस्था तशीही नाही. आपण उठल्यापासून झोपेपर्यंतची कामं पाहिली, तर त्यात इतक्या प्रकारच्या शारीरिक हालचाली आणि मनाचे इतक्या प्रकारचे वापर घडताना दिसतील की, ते नुसतंच कामांत नाही, तर त्यात त्या कामांतसुद्धा पुन्हा काही तोचतोचपणा असला तरी अनेक प्रकारची कामंही त्यांना करावी लागतात.

हे असं असणार आणि जर त्यावर व्यवहार चालणार तर, ते तसं असायला काही हरकत नाही. फक्त लक्ष देण्यासारखी गोष्ट ही आहे की, अशी यंत्रं ज्यावेळेला सतत काम करीत राहातात, तेव्हा त्याची देखभाल, तूटफूट, दुरुस्ती - अशा गोष्टीही ठरावीक काळानं आणि वेळेत कराव्या लागतात. यंत्र वापरणारे ते करतातही. कारण ते वेळेत नाही केलं तर पुढं

झिजल्यानं यंत्रांत बिघाड उत्पन्न होतात, त्यांच्यातली अचूकता कमी होते, संतुलन जातं, नुसतीच खरखर वाढत नाही तर, प्रसंगी ती बंदही पडतात. त्यासाठी त्या यंत्रांचं काम काही मर्यादित तासांनंतर बंद ठेवावं लागतं. त्यांचं तेलपाणी करणं आणि त्याला यंत्र असूनही कामांत विश्रांती देणं - या गोष्टी केल्या जातात. ते केलं तर ती परत कार्यक्षम राहातात.

आधी पाहिलं तसं, शरीर-मनाची अवस्था एवढीही मर्यादित नाही. त्यांचे वापरही असंख्य प्रकारचे आहेत. त्यात प्रत्येक कर्मात मनाची होणारी उलघाल, मनःशक्तीचा वापर, येणारे ताणतणाव, मनाविरुद्ध होणाऱ्या गोष्टी, न पटणाऱ्या गोष्टींसाठीही मनाचा व शरीराचा करावा लागणारा वापर - या साऱ्यांनी मनालाच नव्हे तर शरीरालाही थकवा येतो. त्याचीही झीज होते. यंत्राला विश्रांती देणं किंवा तेलपाणी करणं इतकं सोपं काम देहाच्या आणि मनाच्या बाबतीत नसतं.

त्यातला देह दृश्य आहे. त्याच्या हालचाली, त्याला पडणारे कष्ट, होणारी झीज - हे सारं निदान बाह्यतः तरी दिसू शकतं. पायाच्या तळव्याची झीज, हाताला पडणारे घट्टे, एकाच स्थितीत वापर झाल्यानं मानेला-पाठीला येणारे ताण, स्क्रीनचा परिणाम होऊन डोळ्यांना येणारा शीण - अशा काही दृश्य गोष्टी लक्षात येतात. पण असेच किंवा याहीपेक्षा गुंतागुंतीचे असलेले मनाचे वापर आणि त्यामुळं येणारे ताण हे अनेकदा आपल्या लक्षातही येत नाहीत आणि दृश्य नसल्यामुळं लक्षात घ्यायचं ठरवलं, तरी कळत नाहीत. त्यामुळं त्यांची होणारी हानी, झीज या गोष्टी फक्त समजून घेण्याचा विषय आहे. दोन्हीकडं लक्ष देण्याची गरज मात्र तितकीच आहे. ते लक्ष दिलं गेलं नाही तर यंत्रांपेक्षाही मोठे बिघाड या बाबतीत होतात.

हेच एका उदाहरणानं समजावून देताना स्वामी म्हणतात की, प्रवासी जहाज किंवा विशेषतः मालवाहू जहाज ही एकदा ओझं लादून बंदरातून

बाहेर पडली की, वाटेत प्रत्येक थांब्यावर त्यात्या ठिकाणचे प्रवासी किंवा वस्तू देतघेत चारचार सहासहा महिन्यांचा प्रवास करीत असतात. तो सारा प्रवास अखंडपणे हेलकावे खाणाऱ्या, कधी उसळत्या, कधी वादळी पण समुद्रातच घडत असतो. त्या अर्थानं हे काम सातत्यानं पाण्यात आणि अधांतरी चालू असतं. जहाजात फक्त वेळेला इंधन भरलं जातं आणि मशिनरीची तात्पुरती देखभाल केली जाते.

पण आपल्या हे लक्षात येईल की,त्या अर्थानं ती ज्यावेळेला त्यांच्या मूळ बंदराच्या गोदीत-म्हणजे जहाजं लावण्याच्या जागेत येत नाहीत, तोपर्यंत त्यांना पाण्यावर टिकवून ठेवण्यासाठी, येणाऱ्या सर्व हेलकाव्यांना तोंड देण्यासाठी, सुरक्षिततेसाठी जहाजातल्या सर्व लहानसहान यंत्रणा चोवीस तास कार्यरत असतात. त्यात पुन्हा ते लाकूड असो वा लोखंड किंवा प्लॅस्टिक साऱ्या भागांना ऊन, पाऊस, हवामान यांच्या कितीतरी आणि सारख्या होणाऱ्या बदलांना असंच चोवीस तास तोंड देत राहावं लागतं. यात त्यांची होणार झीज, हानी, नुकसान - सारं उघड आहे. जहाजांचे मालक जर जरा विचारी, सहृदय असतील, तर यामध्ये एखादा दौरा करून आल्यानंतर त्या जहाजाला ते गोदीत काही काळ विश्रांती देतात. त्या विश्रांतीच्या काळात तेलपाण्याबरोबरच झीज भरून काढणं, जास्त झिजलेले त्याचे भाग बदलणं, नवीन टाकणं अशी इतर पूरक कामंही काळजीपूर्वक केली जातात. त्यामुळं ती जहाजं पुन्हा नव्या दमानं पुढच्या दौऱ्यावर बाहेर पडायला सिद्ध होतात. हे केलं गेलं नाही,तर जहाज ते थोडा काळ सहन करू शकतं, तसंच पुढं अधिक काम करू शकतं, पण बिघडतं तेव्हा मात्र उपाय राहात नाही.

यातून आपण बोध घ्यावा. आपापल्या व्यवसायानुसार, नोकरीनुसार किंवा वेळी घरकामानुसारसुद्धा अशाच तऱ्हेच्या काही विश्रांतीची गरज माणसालाही तितकीच आहे. त्याच्या कामाप्रमाणं ती त्याला रोज किंवा

काही दिवसांनी आवश्यक आहे. आठवड्याला सुट्टीचा वार ठेवण्यामागं तत्त्व तेच आहे. पण ते इतकं वरवरचं काम नाही. तांत्रिकदृष्ट्या सुट्टी मिळाली तरी ती जर माणसानं अतिरिक्त कामात घालवली, तर ती विश्रांतीही न दिल्यासारखंच होईल. त्यातही माणसाला या देहाच्या आणि मनाच्या यंत्रणा गुंतागुंतीच्या असल्यामुळं लागणाऱ्या विश्रांतीचं स्वरूपसुद्धा विचारपूर्वक ठरवलेलं आणि वेगळ्या स्वरूपाचं - अधिक सूक्ष्म स्वरूपाचं असणार हे उघड आहे. मशीन बंद करून ते थांबतं, थंड होतं, त्याला विश्रांती मिळते. तसं माणसाला नुसतं आठवड्यातून एक दिवस घरी बसवून ठेवून हे काम साधत नाही. त्यानं तो कदाचित आळसटून जाईल.

त्यामुळं त्याला द्यायच्या विश्रांतीचा विचार हा महत्त्वाचा तर आहेच, पण त्यात प्रत्येकाच्या प्रकृतीप्रमाणं द्यायच्या विश्रांतीचं आणि त्या अर्थानं डागडुजी, देखभाल करून तो पुन्हा ताजातवाना, उत्साहित होणं यासाठी करायची कामं थोडी वेगळ्या स्वरूपाची असणं आवश्यक आहे.

आठवडाभर काम करणाऱ्याला एक दिवस सुट्टी देण्याची तर कायद्यानंही तरतूद आहे. आपल्याकडं इंग्रजी अंमल आला तेव्हा त्यांच्या सुट्टीचा असा रविवार आपलाही सुट्टीचा वार झाला. पण त्याच बरोबर हे लक्षात घेणं आवश्यक आहे की, त्यांचा रविवार हा मुळात 'डे ऑफ प्रेअर - प्रार्थनेचा दिवस' होता. पुढं सुखवादी विचार वाढले, तेव्हा तो जसा त्यांचा वीक एन्ड म्हणजे तसा विसावा किंवा मौजेचा दिवस झाला, तसाच त्यातला आपलाही तो सुट्टीचा-मजेचा दिवस झाला. विश्रांती देण्याची मूळ कल्पना हळूहळू चैनीसाठी खाण्यापिण्याकडं, फिरण्याकडं गेली. आपण ते केलं, पण त्यांच्यातली प्रार्थना लक्षात घेतली नाही, हे नोंद घेण्यासारखं आहे. आपल्याकडं विद्यार्थी जरी झाला तरी त्याला पंधरा दिवसांतून एकदा 'अनध्याय दिवस' देण्याची पद्धत होती. उद्देश तोच होता.

त्यामुळं आपल्या रोज काम करणाऱ्या देहाला आणि ताण घेणाऱ्या मनाला विश्रांती देण्याची गरज ही पूर्वीपासून ओळखली गेलेली आहे. ती विश्रांती काय स्वरूपाची आहे, यावर मात्र अधिक विचार करण्याची गरज आहे. त्यासाठी, द्यायच्या विश्रांतीच्या कल्पना, अनेकदा ढोबळ असल्या म्हणजे मनुष्य त्या सुट्टीच्या दिवशी राहिलेली कामं काढतो. कदाचित घरातली सर्वच माणसं आठवडाभर शाळा, नोकरी अशा व्यापांत असली तर घरातली कामं साठणार. काही गरजेच्या खरेदी, कुणाकडं कामासाठी जाऊन येणं हेही राहिलेलं असणार, हे खरं आहे. त्यालाही वेळ द्यावा लागेल.

तो द्यावा. पण हे लक्षात ठेवावं, की अशा स्वरूपाच्या कामांनी आपण जर आणखी शिणत असू तर या विश्रांतीच्या दिवशीसुद्धा आपण थकून जाऊ. मग सोमवारी आपल्याला विश्रांतीनंतर अपेक्षित असलेला उत्साह कामकाजांना राहाणार नाही. त्यामुळं असं करायची वेळ आली तरीसुद्धा, अशा राहिलेल्या कामांचं नियोजन करून ती या सुट्टीच्या दिवसातल्या अर्ध्या वेळेत बसतील, असं पाहावं लागेल. तर मग उरलेला अर्धा दिवस किंवा निदान संध्याकाळचे काही तास खऱ्या विश्रांतीसाठी मोकळे राहतील, जी आपली गरज आहे.

आता असा सुट्टीचा दिवस वापरताना खरी विश्रांती कशात असते किंवा कोणत्या विश्रांतीची आपल्याला खरी गरज आहे, याचं नियोजनही जरा विचारपूर्वक करावं लागेल. अन्यथा विश्रांती म्हणजे खाण्यातला चवदार बदल, मनोरंजन, सगळ्याचा विसर पाडणारं एखादं व्यसन, क्लब - एवढ्या गोष्टींचाच विचार आपल्याकडून होण्याची शक्यता आहे. अनेकदा तसंच घडताना दिसतं. उलट त्या निमित्तानं आपल्याला पुढं विघातक ठरणाऱ्या गोष्टीच आपल्या जीवनात शिरून त्यापुढं मूळ धरतात आणि अनेक निवृत्त असा फारसा विचार न करता केलेल्या नियोजनानं शेवटी कुठंतरी पत्ते-रमी-

व्यसन अशा गोष्टींत गुरफटून जाऊन मोलाचं मानवी आयुष्य भरकटत नेताना आपल्याला दिसतील. अशानं अपेक्षित ती खरी विश्रांती मिळेल का, की त्यातून देहाला-मनाला अधिक ताण किंवा विकलता येईल याचा विचार जरूर करावा.

त्याऐवजी देहाला एकाच वेळेला योग्य व आवश्यक ते व्यायाम आणि विश्रांती देऊ शकणारी साधी योगासनं, सूर्यनमस्कार, जीवनाला चांगली दिशा देऊ शकणारं वाचन, अभिजात संगीताचं श्रवण, निसर्ग अनुकूल असलेल्या जवळच्या ठिकाणी जाऊन वृक्षाचं किंवा नदीचं ध्यान, एखादा निर्मळ सत्संग, खऱ्या जिव्हाळ्याच्या व्यक्तीची भेट-संवाद, शांत अशा एखाद्या मंदिरातलं प्रसन्न देवदर्शन - सात्त्विक व खऱ्या विश्रांतीचे असे असंख्य मार्ग असू शकतील. आपापल्या परिस्थितीनुसार अनुकूल तो निवडून गरजेनुसार एकट्यानं किंवा कुटुंबासह ही विश्रांती घडू शकेल. त्यानं देह आणि मन दोन्हीही शांतही होतील आणि ताजेतवानेही.

यात जाताजाता एक विचार जरूर करण्यासारखा आहे, तो असा की, जसं चारसहा महिन्याची सफर करील तेव्हा जहाज गोदीत दुरुस्ती व विश्रांतीसाठी लावता येतं, तसं माणसाला आठवड्यातून हा विश्रांतीचा दिवस कारणी लावता येतो. त्याचबरोबर हेही शक्य आहे की, माणसाला दिवसभराच्या कामानंतर निसर्ग जसा रात्रीची झोप देऊन देहमनाला विसावा देतो, तसंच दिवसभराच्या कामानंतर येणारा शीण आठवडाभर साठत जाण्याऐवजी, रोजच सकाळी, संध्याकाळी किंवा रात्री एक दोन मिनिटांचं शांत बसणं-ध्यान-भगवंताची भेट घडवून आणू शकेल अशी निर्मळ प्रार्थना-थोडं नामस्मरण - अशा मार्गानं रोजच्या रोजसुद्धा आपापली जहाजं गोदीत लावता येतील. त्यानं शीण साठणार नाही आणि रोजचा दिवस ताजा आणि प्रसन्न राहील !

*

१०.

मुले दुसऱ्याच्या धक्क्याने पडली असता मोठ्याने रडतात...

- श्री कलावती आई

कोणत्याही सामान्य माणसाला अनुभवाला येणारा दृष्टान्त घेऊन श्री कलावती आई आपल्या आयुष्यातल्या एका मोठ्या दुःखावरचा सोपा उपाय आणि त्यासाठी करायच्या विचाराची दिशा या अमूल्य वचनात आपल्याला देत आहेत.

त्या म्हणतात की, मुलं दुसऱ्याच्या धक्क्यानं पडली असता मोठ्यानं रडतात, पण तेच आपली आपण जर पडली, तर अंगाला लागलेला धुरळा झाडून टाकून मुकाट्यानं घरी जातात.

म्हटलं तर आपल्याला ही कधीही अनुभवाला येणारी गोष्ट आहे. पण आपण त्याच्यावर त्यांच्यासारख्या संतांनी जो विचार केला, तो मात्र केला असेल असं नाही. हा अनुभव तसा साधा असला, तरी तो माणसाच्या मनाच्या प्रवृत्तीवर खरंतर स्वच्छ प्रकाश टाकतो.

आपल्या घरी कधी काही लग्नकार्य ठरतं. कधी एखादा अपघातासारखा चित्रविचित्र प्रसंगही घडतो. कुठल्याही कारणांनी आपल्या घरादाराचा काही वेळ त्यात जातो. आपल्या घरी त्याच वर्षी कुणी मॅट्रिकला किंवा आजकालच्या दहावी-बारावीच्या परीक्षेला असेल आणि त्याला कमी गुण पडले, तर लगेच तो मुलगा-मुलगी म्हणते की,हे लग्नकार्य जर परीक्षेच्या

आधी नसतं तर मला नक्की चांगले मार्क पडले असते. आता हे कारण घरातल्या दुसऱ्यांनी निर्माण केलेलं असल्यामुळं या कमी मार्कांचा दोष पटकन त्यांच्यावर ढकलता येतो, तशी मनाची प्रवृत्ती आहे. वास्तविक कार्य तर असं काही फार काळ त्यांचा अभ्यास अडवीत नाही किंवा चांगला-वाईट प्रसंग या मुलाला काही असा आठपंधरा दिवस जाग्यावर बसवून ठेवीत नाही.घरात कुणाची तशी अपेक्षाही नसते. खरी चूक मुलाचा स्वतःचा अभ्यास, एकाग्रता, दर्जा - अशा गोष्टी कमी पडतात ही असते. पण असं कारण थोडं जरी मिळालं तरी ती चूक कबूल न करता या अपयशाचं कारण त्या लग्नावर किंवा प्रसंगावर मनाकडून पटकन ढकललं जातं.

हे नुसतं मुलाच्या एखाद्या परीक्षेबद्दलच नसतं, नोकरीच्या स्पर्धा परीक्षेत यश मिळालं नाही तर परीक्षा अवघड होती, पेपरात अनपेक्षित प्रश्न होते असं सहजपणे म्हणतो, पण माझा अभ्यास पूर्ण नव्हता असं सहसा म्हणत नाही. तीच गोष्ट एखाद्याला ऑफिसमध्ये त्रास असला तर इतर लोक सहकार्य करीत नाहीत, कुणी नीट काम करीत नाही, कामं प्रमाणाबाहेर सांगतात, त्यामुळं त्रास होतो असं मनुष्य सहज म्हणतो. पण मला कामाची नीट माहिती नाही, मला कामाचा उरक नाही, मला सहकाऱ्यांशी नीट जुळवून घेता येत नाही - अशी स्वतःकडं असलेली कारणं किंवा उणिवा मनुष्य सहज मान्य करीत नाही.

याबद्दल सांगताना श्री कलावती आई म्हणतात की, दुःखाच्या बाबतीतसुद्धा माणसाची इतरांच्याबद्दल तक्रार असते आणि ती इतरांबद्दल असल्यामुळं ते दुःख त्याला जास्त जाणवतं. वास्तविक स्वतः चुकून धक्का लागला तर जेवढं लागतं, तेवढंच दुसऱ्याकडून धक्का लागला तरी लागतं. पण ते दुःख माणसाला दुसऱ्याकडून होतं आहे असं जोपर्यंत वाटतं, तोपर्यंत ते दुःख जास्तही वाटतं आणि जाणवतंही. खरं तर श्री आई म्हणतात की,

आपलं कर्मच आपल्या दुःखाला कारण असतं. हे माणसाला गुरूकडून बोध मिळाला, ज्ञान मिळालं की कळतं. दुःखाला कारण आपणच आहोत हे कळलं की, अर्थातच माणसाची इतरांबद्दलची तक्रारही कमी होते आणि स्वाभाविकच ते दुःखही रास्त आहे असं वाटतं आणि ते कमीही वाटतं.

वर म्हटल्याप्रमाणं जर आधीच्या घटनांकडं पाहिलं तर ऑफिसातल्या त्रासाला आपल्याला इतरांशी जुळवून घेता येत नसतं, आपलं ज्ञान कमी असतं, आपली शिकण्याची वृत्ती कमी पडते - अशी अनेक कारणं आपल्याकडंच असल्याचं आपल्या लक्षात येतं. खरं तर ती दूर करणं आणि हा त्रास कमी करणं हे आपल्याच हातात आहे, ते करण्याची जरूर असते. दुसऱ्यांवर हा त्रास ढकलण्यानं तो कमी तर होत नाहीच, पण आपण असे आवश्यक ते प्रयत्न न केल्यानं उलट तो त्रास कायम राहातो, वाढतोही.

दुसऱ्याकडून धक्का लागल्यानं पडल्यावर जास्त आरडाओरडा करणारं मूल, स्वतःहोऊन पडल्यावर तेवढंच लागूनसुद्धा कमी आरडाओरडा करतं, याच्या मागं एक सूक्ष्म मनोवृत्ती आहे. ती मनोवृत्ती स्वतःच्या चुका साध्या किंवा क्षम्य मानते. तर दुसऱ्याच्या चुका मात्र मोठ्या, अक्षम्य मानते. एखादा निर्णय आपण घेतला की तो रास्त किंवा योग्य समजते, तर तोच किंवा तसा निर्णय दुसऱ्यांनी घेतला की चुकीचा, नुकसानकारक आहे, असं नकळत समजते.

या मनोवृत्तीमागचा विरोधाभास ओळखला तर त्याच चुकांना, दोषांना आपण अधिक नीट समजून घेऊ शकू. होणाऱ्या त्रासांबद्दल, दुःखांबद्दल तक्रार मुळातच कमी होईल. आपल्याला होणाऱ्या बहुतांश दुःखांचं मूळ आपल्यातच असतं, हे एकदा लक्षात आलं तर होणारा त्रास स्वाभाविकपणे कमी होईल.

अशा दुःखांचे,त्रासांचे प्रसंग माणसाच्या वाट्याला रोज येत असतात.

पण त्यांचा निकाल देणारी आणि सुखदुःख उत्पन्न करणारी मनाची यंत्रणा आपल्याला जर गुरुबोधाच्या प्रकाशात नीट न्याहाळता आली, वस्तुनिष्ठपणे पाहाता आली, तर त्यावर खरा प्रकाश पडेल.

मग अपघातात तो आडवा आला, असं वाटण्याऐवजी आपलं रहदारीकडं दुर्लक्ष होतं - आपलं वाहनावर नियंत्रण नव्हतं, हे मनाला मान्य होईल. साधा स्वयंपाकसुद्धा कुठं कमीजास्त झाला असला, तिखटगोड झाला असला तरी जसं आपलं तसं चुकून होऊ शकतं, तसंच ते त्यांच्याकडूनही चुकून होऊ शकतं, असं मनाला सहज वाटू शकेल. गाडी चुकली म्हणून तिकिटाचं नुकसान झालं, कामाचा गोंधळ झाला अशा तक्रारी करण्यापेक्षा आपण गाडीच्या सुटण्याच्या ठरलेल्या वेळेत स्टेशनवर पोचलो नाही, हे लक्षात येईल. गाडी चुकली नाही, आपण उशीरा गेल्यानं आणि ती बरोबर असल्यामुळं हे सारं घडलं, हे मान्य करायला मन तयार होईल.

माणसाच्या मनाकडं दोषांचं भांडवल करणं, तक्रारी करणं, त्रास करून घेणं याचबरोबर दोषांकडं दुर्लक्ष करणं, स्वीकारणं, तक्रार न करणं,विषय न करणं - अशा साऱ्या कुवती आहेत. पण दोष कुणाचा याप्रमाणं मन त्या वापरून आपली उगीच दिशाभूल करतं, हे ओळखलं तर आपण सावध होऊ. अधिक शांत, विचारी राहू शकू.

असं अनेक क्षेत्रांत, अनेक वेळेला होत असतं. त्याचेत्याचे त्रासही होत असतात. पण त्याचं असं संतवचनांच्या प्रकाशात यथार्थ आकलन झालं तर अर्थातच त्रास कमी वाटतील, इतरांना बोल लावला जाणार नाही. त्यामुळं त्यांचे संबंध चांगले राहतील. आपल्या चुका शोधून त्या दुरुस्त करण्याकडं मन लागेल. त्यानं आपणच अधिक निर्दोष होऊ. भगवंताच्या अधिक जवळ जाऊ. मन अधिक निर्मळ होईल. ज्यानं व्यवहारही समजुतीचा, शांतीचा राहील आणि खरा परमार्थही साधेल !

*

११.

नदीच्या पाण्याप्रमाणे सतत प्रवाही राहा...

- श्री शंकर महाराज

नदी तर अनेकांनी पाहिली असेल. अनेक जण तिच्या काठावर राहिलेही असतील. कुणी नदीतून प्रवास केला असेल. कुणी नदीच्या प्रदक्षिणाही केल्या असतील. पण नदीचं आपल्या आयुष्याशी जे नातं आहे, त्याचं चिंतन करणारे विरळाच. त्या अर्थानं या विषयाकडं आपलं लक्ष वेधणारं हे श्री शंकर महाराजांचं वचन जितकं चिंतन करू, तितकं आपल्या आयुष्याला विधायक आणि सार्थकाचं वळण देणारं आहे.

माणसाचं जीवन जसं एखाद्या शुद्ध, निरागस बालकासारखं सुरू व्हावं, तसं अनेक नद्यांचे उगम हे एखाद्या छोट्याशा पण शुद्ध, स्वच्छ पाण्याच्या झऱ्यापासून सुरू झालेले दिसतात. पण झरा शुद्ध आहे, पाणी स्वच्छ आहे व उगम सहसा डोंगरातल्या उच्च स्थानी आहेत, म्हणून उगमाजवळ त्या वातावरणानं आकर्षित होऊन नदी कधी थांबलेली नसते. ती उतार शोधत सतत पुढं जाण्यासाठी गतिशील असते.

परिस्थिती उत्तम असली, जन्म उच्च कुळात असला, लहानपण सुखासमाधानाचं असलं, तरी निसर्गतःसुद्धा जीवन माणसाला शरीरानं, मेंदूनं लहान राहू देत नाही. अगदी लहानपणी कदाचित त्याच्या हाती नसेल, पण हे समजून आलेल्या पालकांनी त्या मुलाला असंच लहान, लाडात न ठेवता ते समजुतीनं भाषा, विचार, कल्पना, निसर्गाचं दर्शन, पेलेल अशी पण

विकसित होत जाणारी जीवनाची शिकवण - या मार्गांनी त्याला प्रवाहित आणि मोठं करीत जाणं हे कर्तव्यच असतं आणि ते सारं निःस्वार्थ, हितबुद्धीनं केलं, तर मुलं तशी विकसित होत जातातही.

नदीचा थोडा विकास झाला की, तिच्या ठिकाणी आपल्याला उतारानं सतत मार्ग शोधीत, प्रवाही राहून ईश्वरस्वरूप महासागराला मिळायचं आहे, या ध्येयाचं एक भान नकळत असलेलं आपल्या लक्षात येईल. माणसालाही लहान वयातच अशा ईश्वरस्वरूपाच्या ध्येयाची एक तर विकासामुळं, वाचनामुळं, सत्संगामुळं ओळख व्हावी किंवा त्यात बरोबरच्या व्यक्तींनी - पालकांनी ती ओळख व्हायला मदत करावी. ती वेळेत झाली असली तर सगळ्या जीवनाला आणि वाटेतल्या सर्व व्यावहारिक टप्प्यांना ती निश्चित आणि योग्य वळण देऊ शकते. ज्यात त्यात्या लहान मुलाचा-व्यक्तीचा कायमचा लाभ होऊन जातो.

नदीची ध्येयाकडची वाटचाल अशी काही सोपी, हिरवळीवरून नसते. अनेक अडथळ्यांना, खडकाळ प्रदेशांना, काट्याकुट्यांना, वारावादळांना - तिला या वाटचालीत तोंड द्यावं लागतं. पण ती त्या साऱ्याला सामोरं जाण्यासाठी लागणारे कष्ट झेलतेच, पण थकत नाही, कुठं विराम घेत नाही. हेही माणसानं शिकण्यासारखं आहे. त्याच्याही ध्येयाकडच्या वाटचाली अशाच अडीअडचणींच्या, अडथळ्यांच्या, प्रतिकूलतांच्या परीक्षा पाहाणाऱ्या प्रसंगांनी भरलेल्या असतात. अनेक जण त्याला घाबरून जीवनाच्या वाटचालीत थांबून जातात. काहीकाही संघर्ष करताना थकून, वाटचाल सोडून देतात. त्यांनी नदीचे प्रवाह अवश्य तपासून पाहावेत. त्यांना अडथळ्यांवर मात करण्याची उमेद आणि मार्ग त्यातून जरूर गवसतील.

हेही पाहावं की, जाताजाता नदी नुसतंच स्वतःच्या ध्येयासाठी पळत न राहाता किती कामं, किती परोपकार करीत असते ! वाहून आणलेल्या

गाळानं काठावरची जमीन ती सुपीक करीत जाते. तहान भागवण्यासाठी आशेनं येणाऱ्या गुरावासरांची काळजी घेते. वाहून आणलेलं पाणी माझं म्हणून द्यायचं नाकारीत नाही. ते कमी होईल याची चिंता करीत नाही. त्यामुळं असंख्य पशूच काय पक्षीसुद्धा पाण्यानं तृप्त होतात.

जाताजाता काठच्या खूप दूरच्या परिसरापर्यंत ती पाणी झिरपू देते. त्याच्यावर त्या परिसरातली झाडंपेडं मुळं धरतात, वाढतात, त्यांना फळंफुलं येतात. त्याचबरोबर या मुरलेल्या जमिनीतल्या ओलीवर, माणसांनी जगण्यासाठी पेरलेली धान्यं उगवून येतात. नदीचे हे वाटचाल करतानाचे सृष्टीवरचे अमूल्य उपकार असतात, तेही निरपेक्ष. कारण या उपकारानंतरही ती कसल्या परतफेडीची, आभाराची वाट न पाहाता आपल्या मार्गानं पुढं निघून गेलेली असते.

माणूस मोठा होत जाईल तसा शिक्षणानं, संस्कारानं, शरीरानं समृद्ध होत जातो. त्याला जर हे नदीचं जीवन कळलं, अभ्यासता आलं, तर तो लहान विद्यार्थी असो, कॉलेजमधला युवक असो किंवा सुशिक्षित नोकरदार तरुण असो - त्याला त्याच्या आजूबाजूच्यांसाठी किंवा लांबच्याही गरजूंसाठी करता येण्यासारखं असं निरपेक्ष कार्य नक्की गवसेल. विद्यार्थी खालच्या वर्गातल्या विद्यार्थ्यांना निःस्वार्थीपणे अभ्यासातली मदत करील, नोकरदार इतर नोकरी नसलेल्यांना मार्गदर्शन करील, पगारातून गरजूंना मदत करील आणि नदीप्रमाणं पुन्हा आपल्या जीवनाच्या पुढच्या टप्प्याचा प्रवास तसाच पुढं, कुठं न गुंतता, सातत्यानं सुरू ठेवू शकेल.

आपण नदीकडं अधिक बारकाईनं पाहिलं, तर लक्षात येईल की, तिच्या शेकडो मैलांच्या मार्गावर तिच्यात असंख्य जलचरांचं पोषण होत असतं. तर नदी त्यांचं निवासस्थान असते. ज्याला स्वतंत्र खोली घेऊन शिक्षणासाठी, नोकरीसाठी राहाणं शक्य असतं तो त्याच्या खोलीत, ज्यांना

हे शक्य नाही अशा गरजू विद्यार्थ्यांचं निवासस्थान बनू शकणार नाही काय? तीच गोष्ट नदीकडं पाहाताना आपल्याला अजूनही एका बाबतीत लक्षात येईल, की नदी ओलांडण्यासाठी जसे जलमार्ग असतात, तसेच त्याहीपेक्षा या गावाहून त्या गावाला जाण्याचे काही जलमार्गही नदीतून जातात. मोठमोठ्या नद्यांच्या पात्रात माणसं, सामान यांची वाहतूक करणाऱ्या होड्या अशा गावोगावी प्रवाशांना मदत करताना दिसतील. या मार्गाचं हे वैशिष्ट्य आहे, की रस्त्यांच्या निर्मितीसाठी आणि त्यावरून जाणाऱ्या वाहनांसाठी खूप खर्च आहे, पण हा जलमार्ग मात्र मुळात तिची उदार देणगी आहे, सेवा आहे. होडीचा खर्चही अर्थातच कमी आहे. माणसाला आयुष्यभरातसुद्धा अशा पद्धतीनं अनेकांची सेवा करणं शक्य आहे.

श्री शंकर महाराज सुचवीत तो मुद्दा आणखीच महत्त्वाचा आहे.ते म्हणतात की, माणसाचं जीवनसुद्धा कुठल्या माया-मोह-लोभ असल्या संचयात अडकू नये, नदीसारखं निरहंकार व प्रवाही असावं. वाटेतल्या या सत्कार्यांचा कुठला अहंकार न होता, उलट तिनं सागराच्या भेटीसाठी उत्कंठेनं सतत पुढं जात राहावं, तसं माणसाचंही असावं. ते तर म्हणत, सागराची भेट झाल्यावरसुद्धा ती भेट पुन्हापुन्हा व्हावी म्हणून वाफेच्या-ढगाच्या-पावसाच्या रूपानं पुन्हा जन्म घेऊन हाच सार्थकाचा प्रवास परतपरत करून ईश्वररूप सागराला पुन्हा मिळण्याची तिची सात्त्विक आकांक्षा पाहावी,शिकावी.

असं नदीसारखं प्रवाही आणि ध्येयमय राहून सार्थकाचं जीवन जगणारी माणसं ईश्वरमय होतातच, पण अशीच संतस्वरूप मंडळी जगाच्या कल्याणार्थ नदीसारखंच 'तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी !' म्हणत, अशा उच्चकोटीला जाऊ शकतील. त्यासाठी श्री शंकर महाराजांच्या या वचनाचं मनन, चिंतन, आचरण खचितच मदत करील !

*

१२.

आपल्या नियोजनात परमेश्वराचे अस्तित्व व त्याने केलेले नियोजन याला वाव ठेवा..

- पूज्य भय्याजी कायंदे

आज प्लॅनिंग किंवा नियोजन करणं हा परवलीचा शब्द आहे. केजीतल्या मुलाचा अभ्यास किंवा खेळ यांच्या नियोजनापासून सगळ्या जगाचं पुढच्या दहा-वीसच काय वेळी पन्नास वर्षांच्या चित्राचंसुद्धा नियोजन आज आखलं जात असतं. जसं शंभर वर्षांनी लोकसंख्या, हवामान, झाडंपेडं, वन्यजीवन यांची स्थिती कोणती असेल, हे काही आडाख्यांनी ठरवलं जातं. ते ठरल्यावर ती परिस्थिती कशी असावी, याच्या कल्पना मांडल्या जातात. त्यांतल्या सर्व कल्पना किंवा आदर्श व्यक्ती-राज्य यांच्या कल्पना प्रमाण धरून आपलं आजचं जीवन, दिशा, रोजचं काम, भविष्यासाठीच्या तरतुदींचं प्रमाण - अशा गोष्टी ठरवल्या जातात.

तीच गोष्ट सामान्य कुटुंबाच्या पातळीवरही आहे. तिथंही चाळीस-पन्नास वर्षांचं प्लॅनिंग साधारण विचारी मनुष्य करतो. या नियोजनाचे अनेक लाभही आहेत. त्यामुळं भविष्याविषयीच्या कल्पना निश्चित होतात. काही तरी कृतींचा कार्यक्रम व दिशा ठरते, भावी परिस्थितीला तोंड देण्याची एक मानसिकता तयार होते. त्यामुळं आपल्या दैनंदिन आयुष्यालासुद्धा एक वळण लागतं. दिनक्रमातला विस्कळीतपणा कमी होऊन एक आवश्यक अशी शिस्त, निश्चितता येते. जगण्यातला बेसावधपणा कमी झाल्यानं

नुकसानही कमी होतं. स्वतःच्याच नव्हे इतरांच्या आयुष्यांशी, कर्तव्यांशीसुद्धा आपली बांधिलकी कळून येते, बऱ्याच अंशी ती पुरी करता येते.

या साऱ्या गोष्टी पूर्वीही सर्वत्र होत्याच, पण त्यांची उपयुक्तता लक्षात आल्यावर त्यांचा अधिक अभ्यास केला जाऊन विविध विषयांतल्या प्लॅनिंगचं एक शास्त्र निर्माण झालं. इतकंच काय, एकूण व्यवस्थापनशास्त्र या अलीकडं विस्तारलेल्या शास्त्राचा, नियोजन हा एक महत्त्वाचा घटक बनला. त्या त्या क्षेत्राप्रमाणं, पूर्वानुभव लक्षात घेऊन कामाला नियोजनबद्धता कशी आणायची, याचे अनेक शास्त्रीय स्वरूपाचे निश्चित निकष निर्माण झाले. त्यांचे उपयोग आपण आजही करतो आहोत.

फक्त याचा जे वापर करतात, अनुभव घेतात - त्यांच्याही एक गोष्ट गोष्ट जरूर लक्षात आली असेल की, या साऱ्या नियोजनात वैयक्तिक, सामूहिक, संस्थात्मक अशा नियोजनाबरोबरच दोन - तीन विचारणीय गोष्टी आपल्या मनात व आयुष्यात शिरल्या आहेत. एक तर आपण करतो ते नियोजन पूर्वीचे आपले अनुभव - ते माणसांचे असोत, निसर्गाचे असोत, घटनांचे असोत - आपल्याला आधार म्हणून गृहीत धरावे लागतात. मग परिस्थितीशी त्यांची सांगड घालून पुढचं नियोजन आपल्याला ठरवावं लागतं.

पण, यात आधार म्हणून जे घटक, आत्ता म्हटले ते सारे इतके स्थिर आणि अमुक अंदाज करण्यासारखे नसतात, हे अनेकांच्या लक्षात येत नाही. उदाहरणानं पाहू. शेतीची कामं, जूनच्या पहिल्या आठवड्यात पाऊस, पेरणी, निगराणी, मग पावसाची उसंत, मग मधल्या टप्प्यातली कामं, मग पुन्हा पाऊस, मग तो थांबणं, मग सारी पिकं येणं-दिवाळीत कापण्या-नवं धान्य-असं नियोजन केलं जातं. आपले पुढचे व्यवहार किंवा स्वतःपुरतं अनेकांना वाटतं तसं, मी अठराव्या वर्षी बारावीत-मग एवढेएवढे गुण मिळवणार -मग ही साईड-मग प्रवेश, तो अमुक गावी, तिथं राहाणं-जेवणं

यांची व्यवस्था-मग पदवी-पुढचं शिक्षण-मग त्याला अनुकूल नोकरी, त्यात प्रगती, स्थैर्य, पसंतीचा विवाह, मुलं - असं एक प्लॅनिंग डोक्यात असतं. नियोजन म्हणून अशा तऱ्हेनं ते घडावं, निश्चित स्वरूपात मनुष्य निश्चित वेळी तिथंतिथं पोचावा, हे चांगलंच आहे. पण अनुभव असा येतो की, कुठंतरी प्रवेशप्रक्रियेत घोटाळा होतो. चांगल्या गेलेल्या परीक्षा रद्द होतात. पुन्हाच्या वेळी मागच्यापेक्षा पेपर अवघड जातात. मग गुणांप्रमाणं प्रगतीची संधी बदलते. काहीकाही वेळा क्षेत्रंसुद्धा बदलतात. मग त्यानुसार गावं, तिथली राहणी, भेटणारे लोक, आपल्या आयुष्यावर होणारे त्यांचे चांगलेवाईट परिणाम, सारंच इतकं बदलतं की, त्यामुळं अनेकदा आपण नियोजन केलेलं आयुष्य ते हेच होतं का असं वाटतं, इतकं ते चित्र बदललेलं असतं !

नियोजनानं ज्या काही गोष्टी घडतात त्यांच्याकडं लक्ष द्यावं लागतं असं म्हटलं ते या बाबतीतच की,पहिलं म्हणजे माणूस ज्या स्वतःच्या किंवा जगाच्या अनुभवावर ही नियोजनाची इमारत उभी करतो, ती काही जगातली एकमेव इमारत नाही की,तिच्याप्रमाणं व्हावं म्हणून बाकीच्या जगानं झटावं.

अनेकदा हे लक्षात घ्यावं लागतं की, या सर्व सृष्टीतसुद्धा आपल्यासारखंच असं नियोजन सुरू आहे. त्यातला आपण एक नगण्य भाग आहोत. इतर व्यापक नियोजनाशी ते सुसंगत असेल, तर आपलं नियोजन यशस्वी होईल, नाहीतर त्यात बदल घडतील, हे लक्षात ठेवावं लागतं !

त्यामुळं अनेकदा मी एवढं ठरवूनही असं का व्हावं, त्यातही विशेषतः माझ्याच बाबतीत असं का व्हावं, वगैरे निराशावादी विचार अनेकांच्या मनात येतात. अशा विचारांनी असलेली चांगली परिस्थितीसुद्धा आणखीच बिघडते. अशा वेळी या नियोजनाच्या विषयांत पू. भय्याजी सुचवतात तशा, काही गोष्टी आपण विचारात घेतल्या तर बरं होईल.

एकतर, आपण करतो ते नियोजन ज्या अनुभव, घटना यांवर

आधारलेलं असतं, त्या त्याच क्रमानं तशाच पुन्हा आपल्या बाबतीत घडतील ही फक्त एक शक्यता आहे, हे गृहीत धरणंही आवश्यक आहे. साधा माणूससुद्धा चार दिवस असा वागला म्हणून, पाचव्या दिवशी असाच वागेल ही केवळ शक्यता आहे. तशी खात्री गृहीत धरू नये - हे समजून रहावं, म्हणजे वेगळा अनुभव आला तरी नियोजनाबद्दल अपयश किंवा परिस्थितीबद्दल निराशा वाटणार नाही.

दुसरी गोष्ट म्हणजे, सतत नियोजन केलं की, एक निश्चिंतता मनाला येते. एका अर्थानं ती ठीक असली तरी, ती एक प्रकारची बेसावधताच असते. नवशिका ड्रायव्हर सतत सावध असल्यानं सुरक्षित पोचावा आणि अनुभवी ड्रायव्हर मात्र, अनुभवानं नकळत येणाऱ्या, बेसावधतेनं अपघाताला बळी पडावा तसं काहीसं हे असतं.

नियोजनाचा अनुभव कितीही मोठा असला तरी, जगातले अगणित घटक आणि त्यांच्या बदल-वर्तन यांच्या क्षमतेच्या पुढं - आपलं नियोजन छोटं असतं याचं भान ठेवून सावध राहिलं तर, परिस्थितीतल्या बदलानुसार वेळी नियोजनातल्या त्रुटीसुद्धा काढून टाकत राहता येईल. नातवासाठी बाळलेणी करून ठेवताना, मुलाचंच लग्न वेगवेगळ्या कारणानं पुढं जात, शेवटी न व्हावं - तसं होतं. यावेळी मात्र निदान खंत करीत राहण्यापेक्षा, दुसऱ्या गरजूसाठी जी लेणी हवी होती, ती आपल्याकडून घडायची होती, ती घडली, ही परमेश्वराची इच्छा लक्षात घ्यावी. आता, आपलं नियोजन बाजूला ठेवून, ती बाळलेणी त्या गरजू बाळाला घातली तर, त्यात समजूतदारपणाचं समाधान आहे. गरजूची गरज पुरी झाल्यानं त्याला आनंद आहे आणि हे सारं केल्यानं परमेश्वरालाही अधिक आनंद आहे. यात आपल्या नियोजनात कमतरता नसली तरी परमेश्वराच्या नियोजनाचा विचार सुरू होईल, जो होणं आवश्यक आहे.

तिसरी गोष्ट म्हणजे माझ्याबरोबर घरातल्याच काय, इतरांच्याही आयुष्याला काही स्थान, महत्त्व असतं आणि ते देण्याची गरज असते. आपलं प्लॅनिंग हा त्यांच्यात्यांच्या आयुष्याच्या नियोजनातलाच एक भाग आहे. त्यात तो कमी महत्त्वाचा असो किंवा जास्त महत्त्वाचा असो. तो आहे असं मान्य करण्याची एक सात्त्विक, मानसिक तयारी ठेवली तर, इतरांचा रागराग होणार नाही. आपल्या मागं पडणाऱ्या गोष्टींचीही खंत वा काळजी वाटणार नाही.

चौथी गोष्ट म्हणजे नियोजन हे मूलतः भविष्याबद्दल असल्यामुळं आपण भूतकाळ, वर्तमानकाळ, त्यातले अनुभव - अशा कितीही पक्क्या पायावर ते उभं करण्याचा प्रयत्न केला तरी, त्यात यांतल्या कशावरही आपली सत्ता पूर्वीही नव्हती, आजही नाही, आणि उद्याही असणार नाही. पण याचा अर्थ त्यांवर कुणाचीच सत्ता नसते, असं मात्र अजिबात नाही.

मगाशी जे मान, स्थान, विचार, इतरांचे अनुभव, प्लॅन, बेत यांना दिला तोच मान - या सर्वांचा सर्वश्रेष्ठ प्रतिनिधी असलेल्या निसर्ग-परमेश्वर या शक्तीला द्यावा. पण पू. भय्याजी लक्षात आणून देतात, ते अत्यंत महत्त्वाचं आहे की, आपल्या साऱ्या प्लॅनिंगमधली - प्लॅनिंग मेंटॅलिटीमधली महत्त्वाची चूक ही की, त्यात परमेश्वराच्या अस्तित्वाचा विचारच नसतो.

आपलं प्लॅनिंग हा पक्का मसुदा अशी आपली समजूतच नव्हे, खात्री असते. पण यातच गफलत आहे. आपलं प्लॅनिंग हा कच्चा आराखडा आहे, असंच मनानं मानायला शिकवलं पाहिजे. त्यांत मोकळे दुवे, गॅप्स ठेवायचे असतात. त्याच्या आशीर्वादानं ते भरले जावेत, अशी वृत्ती ठेवायची असते.

या वचनातली दृष्टी इतकी महत्त्वाची आहे की, त्यामुळं अनेक गोष्टी आपल्या प्लॅनिंग बाहेरच्या जीवनात येऊन संकटं, अपयशं, विशेषतः बदल, अनपेक्षित प्रसंग वाट्याला येऊनसुद्धा -ते आता परमेश्वराचं प्लॅनिंग आहे, ते

अंतिमही आहे आणि आपल्या हितासाठीच आहे, हे लक्षात येऊन निराशा वाटत नाही. मनुष्य दुःखात, सुखात, गोंधळात - कशातच बुडून जात नाही. डिप्रेशन येत नाही.

आपल्याला असं आढळेल की, नियोजनाचं महत्त्व, स्थान, गरज, उपयुक्तता, वापर सारं करूनसुद्धा या वचनाच्या प्रकाशात जर ते झालं, तर चित्ताला कसल्याही प्रसंगात शांतता राहाते, निदान टिकवता येते. हे सर्वत्र घडतं. अनपेक्षित निकाल, गुण, अभ्यासक्रम यांचा स्वीकार करावा लागतो. कुठल्यातरीच गावी जावं, रहावं लागतं, घर बांधून तिसऱ्याच घरी बिऱ्हाडं करावी लागतात, ज्यांचा संपर्क यावा, टिकावा तीच माणसं तुटतात - तर अनपेक्षित माणसं वाट्याला येतात, वेगळीच कामं, नाती वाट्याला येतात ज्याच्या मदतीचं नियोजन, व्यवस्था केली तो कसल्यातरी कामांत अडकतो आणि संबंधसुद्धा येणार नाही असा कुणी येऊन, मोलाची मदत, न मागता करून जातो. सत्संगासाठी आखलेली योजनासुद्धा अचानक रद्द होते, नि वेगळाच अनपेक्षित सत्संग सहज मिळतो. अशा अगणित प्रसंगात या देवाच्या प्लॅनिंगच्या वस्तुस्थितीची जाणीव शांत राहायला फार मदत करते.

एकूण काळानुसार नियोजनबद्ध जगण्याची एक वाढती गरज असली तरी तिचा पूर्ण लाभ हवा असला तर, तिच्यातल्या या ईश्वराच्या अंतिम नियोजनाची जाणीव ठेवावी. अशी समजूतदारपणे ती जाणीव ठेवली, तर ते आपल्याच किती स्वास्थ्याचं नि हिताचं होईल !

पाचवी गोष्ट म्हणजे, नियोजनाची ही एक अधिक दृष्टी आली तर, आपापली नियोजनं आणि त्यांच्या यशामुळं येणारा अहंकार दूर व्हायला मदत होते. म्हणजे असं की, ईश्वरी नियोजन हे अंतिम असल्यानं ते प्रत्येक घटनेत असतंच. तो काही अपवाद नव्हे. आपल्याला त्याची जाणीव फक्त अपयशं, दुःखं, अनपेक्षितता - यावेळी होते एवढंच !

हे जर ठाऊक असेल तर, आलेल्या यशातसुद्धा ईश्वराचं नियोजन आपल्या बेतांना, योजनांना अनुकूल होतं, म्हणून तेते यश आलं, याची जाणीव राहून सावधता टिकते, नम्रता राहाते. नाहीतर अनेकांची अशी अवस्था झालेली आपण पहातो की, स्वतःच्या शिक्षणात, नोकरीत, घरंदारं, मुलं, त्यांची शिक्षणं - अशा नियोजनांत अशी माणसं यशस्वी होत जातात. मग स्वतःच्या कौतुकापलीकडं आणि ते इतरांनी करावं यापलीकडं - त्यांना जगच उरत नाही. त्यातही तसं कौतुक करणारे चांगले, त्याची फार दखल न घेणारे हे आपलं चांगलं न बघवणारे वाटायला लागतात - मग त्यांची उणीदुणी काढणं असं जीवन होऊन बसतं.

इथंपर्यंतचा अहंकाराचा आणि लोकांच्या नकारात्मक विचारांपुरता प्रवास होतो. मग कधी तरी एखादा ब्रेक, या सतत यशाच्या गिअरमध्ये धावणाऱ्या गाडीला लागतो. त्यावेळी या ईश्वरी सहभागाची कल्पना नसल्यानं, त्यावर विश्वास नसल्यानं, तर कधीकधी ती अंधश्रद्धा किंवा मानवी दुबळेपण म्हणून त्याची हेटाळणी करीत आल्यानं - असे धक्के सहन होत नाहीत ! मनुष्याचं, त्याच्या घरादाराचं स्वास्थ्य जातं - ते कधी दिसतं, कधी प्रतिष्ठा जपण्यासाठी लपवलं जातं, पण असल्या परिणामांना तोंड द्यायला लागणं काही चुकत नाही. त्यातून येणारी निराशा, अपयशं, वैफल्यं - हीसुद्धा टळत नाहीत.

म्हणून आपण आपापल्या अनुभवाप्रमाणं, बुद्धीप्रमाणं नियोजन जरूर करीत असावं, पण संतांच्या सांगण्यातलं शाश्वत सत्य लक्षात घेऊन त्यातल्या ईश्वराच्या नियोजनाला, ते आनंदानं स्वीकारण्यालाही - वाव ठेवावा. ते अंतिमतः प्रत्येकवेळी आपल्याला संतुलित आणि समाधानी ठेवील !

*

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात : आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती) श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. संतबोध : भाग ४ : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार : मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. उत्तरायण -भाग ३ : जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. अनुभवपुष्पे - भाग २ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. श्रद्धा : श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. अनुभवपुष्पे - भाग ३ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. अर्घ्य : ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. जीवनचिंतन : दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. स्वास्थ्यसंवाद : मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. वचनांजली भाग १ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. अक्षरायण : आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. वचनांजली भाग २ : श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. भावगीता : श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

नराचे नारायण होणारे संत म्हणजे या युगातले सार्वत्रिक व दृश्य चमत्कार होत. स्वतःसारखी देवत्वाची स्थिती इतर सामान्य माणसांना मिळावी म्हणून निरहंकार, निःस्वार्थी व निःस्पृह वृत्तीनं संत आपलं आयुष्य सर्वांसाठी वेचतात. संतांचा मार्ग शिकण्याचं एक सोपं साधन म्हणजे त्यांची अनमोल वचनं. संतवचनांतून मिळणारा बोध व्यक्तीला जागं करतो, प्रेरणा देतो, नवी दृष्टी देतो.
अशा निवडक संतवचनांचं निरूपण

संतबोध

त्यांच्या बोधाचे चिंतन । आम्हा घडो रात्रंदिन ।।
आचरणाची नित्य सेवा । दीन म्हणे घडो देवा ।।